परस्परं भावयन्तः
म प्र

मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक १३१ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ सप्टेंबर २०२२

Website : www.marathepratishthan.org (फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

***प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना***
***माझा स्नेहपूर्वक नमस्कार.***

''अदित्य् जायते वृष्टीः'' म्हणजेच जोपर्यंत सूर्य आहे तोपर्यंत पाऊस निश्चित आहे. निसर्गाचे विलोभनीय रूप म्हणजे पावसाळा. अत्यंत आल्हादायक हवामान, ऊन, पाऊस, फुलांचा दरवळ, हिरवीगार सृष्टी आणि अविरत कड्यावरून कोसळणारे धबधबे, जलधारांनी वृक्ष-वेली, धूसर ढगांनी व्यापलेले आकाश, समस्त सृष्टीला प्रफुल्लीत करणाऱ्या अशा पावसाळ्यात 'हितगुज' सप्टेंबर अंक (डिजीटल स्वरूपात) निघतो आहे.

यावर्षी कोरोनानंतर वारकरी पंढरीला दिंडी घेऊन गेले. ''होई होई तू वारकरी। पाहे पाहे रे पंढरी'' असे तुकोबांनी म्हटल्याप्रमाणे पायी चालत पालखी सोहळा संपन्न होऊन विठोबाचे रूप डोळ्यांत साठवून वारकरी धन्य झाले. आनंदाची परिसीमा म्हणजे या वारकऱ्यांनी पायी केलेली आषाढीची पंढरीची वारी आहे. आषाढी एकादशी पाठोपाठ गुरूपौर्णिमेचा उदय होतो. त्यानंतर श्रावण महिना ते गणपती उत्सव भक्तीमय वातावरण निर्माण होते. आपले सण व उत्सव हे आपल्या संस्कृतीचे अविभाज्य अंग आहे. आपली संस्कृती टिकून राहण्यास आणि पुढे नेण्यास ते उपयुक्त ठरतात, तसेच सद्गुणांची परंपरा कायम राखतात त्यामुळे नव्या पिढ्यांना सणांचे महत्त्व समजायला हवे. म्हणून तर, Human beings are fond of festileves 'उत्सवाप्रियाः खलु मानुषाः।' असे म्हटले आहे.

कोरोनानंतर यंदा सरकारच्या निर्णयामुळे गणेशोत्सव धूमधडाक्यात होणार. सार्वजनिक गणपती मंडळांची संख्या दरवर्षी वाढतच जाते. रहदारीच्या रस्त्यावर मंडप उभारून वाहतूक कोंडी केली जाते. दिवसभर ध्वनिवर्धकांवर गाणी लावून ध्वनिप्रदूषण होते. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, आजारी माणसं आणि नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत पाहिला जातो. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव जनजागृती करण्यासाठी केला हा हेतू विसरून गणेशोत्सवाचे स्वैराचारात रूपांतर होऊन सणांचे विकृतीकरण होत आहे हे पाहून दुःख होते. यंदा स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात गणपती उत्सव आणि आपले सण यांचे पावित्र्य, शुचिता जपून उत्सव हा उत्सवासारखाच साजरा व्हायला पाहिजे याची जबाबदारी सर्व गणेशमंडळांनी घेतली पाहिजे. विघ्नहर्ता श्रीगणेश अशी सुबुद्धी सर्व गणेशभक्तांना देईल अशी श्रीचरणी प्रार्थना सर्व मराठे कुलबांधव-भगिनी करीत आहेत. असो.

आपली शुभचिंतक
**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),
(दि. २६ जुलै, २०२२),
संत नामदेव महाराज पुण्यतिथी
भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२/८४३३६ ७४८२७

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ९८२०२३२०८२ • इ-मेल : parbhakar.marathe@gmail.com
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

# रुपयाची दिशा आणि दशा

• डॉ. अभिजित फडणीस

**ब**रोबर २० वर्षांपूर्वी एक अमेरिकी डॉलर म्हणजे ४६ भारतीय रुपये आणि ५८ पाकिस्तानी रुपये होते. आज डॉलर ८० भारतीय रुपये, तर २०६ पाकिस्तानी रुपये झाला आहे. चलनाचे नाव सोडले, तर बाकी पाकिस्तानशी कुठलीच तुलना करणे योग्य ठरणार नाही. श्रीलंकन रुपयाची गडगड तर विचारायलाच नको, चलन गडगडणे, म्हणजे काही तरी संकट आहे, हे अगदी सामान्य माणसालाही पटकन कळते. तरी ऐंशीच्या दशकासारखा एक डॉलर म्हणजे दहा रुपये किंवा जमल्यास एक डॉलर म्हणजे एक रुपया असे का होऊ शकणार नाही, असा भाबडा आशावाद धरणारी माणसे आजही आहेत. सन २०१३ मध्ये केवळ सहा महिन्यांत डॉलर ५४ रुपयांवरून ६६ रुपये एवढा



वधारला, म्हणजे रुपया गडगडला. त्या वेळी देशांतर्गत संकट होते. वेगवेगळ्या प्रकारचे भ्रष्टाचाराचे राष्ट्रीय घोटाळे बाहेर येत होते. 'यूपीए-२'च्या काळात महागाईने कहर केला होता. परकी गंगाजळी तीनशे अब्ज डॉलरच्या खाली गेली. 'यूपीए'चे सरकार २००४ मध्ये सत्तेवर आले, तेव्हा शंभर अब्ज डॉलर असलेली परकीय कर्जे, २०१३ पर्यंत चारशे अब्ज पार करून गेली होती. भारतात कर्ज उभारणी करण्यापेक्षा, परकी बाजारात कर्ज उभारणे भारतीय कंपन्यांना परवडत होते. त्यानंतरच्या नऊ वर्षांत हीच कर्जे सहाशे अब्ज डॉलरचा आकडा पार करून गेली आहेत; मात्र परकी गंगाजळी ५८८ अब्ज डॉलर आहे. या वर्षाच्या सुरुवातीला हीच गंगाजळी, परकीय कर्जाहून अधिक, म्हणजे ६४० अब्ज डॉलर होती.

कुठल्याही चलनाचा विचार करताना, देशांतर्गत कारणे व जागतिक घटना असा दुहेरी विचार करावा लागतो; त्याचबरोबर भारताचे जगाशी होणारे विनिमय आणि व्यवहार यांचाही विचार करावा लागतो. त्यातील काही बाबी स्थायी व काही तात्कालिक असतात. स्थायी बाबींचा विचार करता भारताचे तेल, संरक्षण सामग्री, काही यंत्रसामग्री यांबाबत प्रगत देशांवरचे अवलंबन आधी लक्षात घ्यावे लागते. त्याची दुसरी बाजू म्हणजे, माहिती तंत्रज्ञान आणि संबंधित सेवा क्षेत्रात भारताची जगात असलेली मातब्बरी; तसेच मोठ्या प्रमाणात अनिवासी भारतीयांकडून कुटुंबाला साह्य म्हणून भारतात येणारा निधी. या उणे आणि अधिक बाबींचे पडसाद भारताच्या चालू खात्यात (निर्यात उणे आयात) असलेल्या आधिक्य किंवा तफावतीत पडत असते.

सन २०२० मध्ये तेल गडगडल्यावर आणि अनेक प्रकारच्या आयातींना खीळ बसल्यामुळे, आपण आधिक्य अनुभवले. यंदा रशिया-युक्रेन युद्धानंतर जगातील तेलाच्या किमती पटकन वाढल्यावर आपली तफावत पुन्हा वाढली. तफावत वाढली, की परकी गंगाजळी खर्ची पडते आणि चलन गडगडू लागते. याच तफावतीच्या काळात परकी गुंतवणूक मोठ्या प्रमाणात येत राहिली, तर चलनावर दुष्परिणाम होत नाही; कारण तफावतीतून निर्माण होणारी डॉलरची मागणी परकी गुंतवणूक तोलून धरते. तसे झाले नाही किंवा भारतीय बाजारातून गुंतवणूक काढूनच घेतली गेली, तर रुपया गडगडण्याकडे कल वाढतो. सन २०२० आणि २०२१च्या कोव्हिडकाळात भारतात गुंतवणुकीचा प्रवाह अव्याहत राहिला. उद्योगातील परकी थेट गुंतवणूक, भांडवल बाजारात गुंतवणूक; तसेच स्टार्टअपमधील गुंतवणूक वाढत राहिली. सन २०२१च्या अखेर चित्र बदलू लागले. कोव्हिडकाळात अमेरिकन फेडरल रिझर्व्ह; तसेच इतर देशातील नियामकांनी कमी राखलेले व्याजदर करोनोत्तर जगात पुनश्च वाढू लागणार, याची चाहूल लागली. कमी दराने कर्ज उभी करून जगभर गुंतवणूक करणे, हे 'कॅरी ट्रेड'चे चक्र आता उलट फिरवावे लागणार, हे स्पष्ट दिसू लागले. त्यातच

करोना जगाच्या कुठल्या ना कुठल्या भागात प्रभाव दाखवत राहिला आणि त्याची परिणती म्हणून अनेक महत्त्वाचे सुटे भाग, कच्चा माल सहज मिळेनासा झाला. महागाईचा जाच वाढला, त्यावर मात करण्यासाठी व्याजदर वाढवण्याची घाई उडणार, हे स्पष्ट होते. अशा व्याजदर वाढवण्याचा उपयोग मागणी कमी होण्यासाठी होतो; मात्र पुरवठ्यातील अडचणी दूर होण्यासाठी त्याचा काही उपयोग होत नाही हे माहीत असले, तरी व्याजदर वाढवण्याचा मोह आवरता येत नाही. आवश्यक नसले, तरी डॉक्टरांनी इंजेक्शन टोचल्यावर रुग्ण समाधानी होतात, तसेच हे.

अमेरिकेत व्याजदर वाढल्यावर जगभरातील, विशेषतः विकसनशील देशातील, चलने डॉलरसमोर लोटांगण घालतात; कारण त्या त्या देशातून पैसे काढून परत अमेरिकेत गुंतवण्याकडे प्रवाह सुरू होतात. भारतीय भांडवल बाजारातून परकी गुंतवणूकदारांनी गेले काही महिने सातत्याने विक्रीचा मारा केला. त्यातच रशिया आणि युक्रेन युद्धाने आगीत तेल ओतले. युक्रेन हे धान्याचे कोठार आहे. रशियावर निर्बंध लादले गेले. तेलाचे भाव कडाडले. महागाई कडाडली. व्याजदर आणखी वेगाने कडाडले. युरोसारखे चलन डॉलरसमोर १६-१७ टक्क्यांनी एका वर्षात गडगडले.

पाकिस्तान, टर्की, अर्जेंटिना, श्रीलंका यांच्यासारख्या आर्थिक अराजक आलेल्या देशांचे तर विचारूच नका. आता परत एकदा भारताकडे वळू. रशियाने युक्रेनवर चढाई केल्यानंतर, रशियावर लादलेल्या निर्बंधावर शिताफीने मात करीत, भारताने रशियन तेल बाजारभावापेक्षा २८ ते ३० डॉलर कमी दराने खरेदी केले. वाढत्या व्याजदरांमुळे अमेरिकेत मंदीची भीती आहे; त्यामुळे तेलाच्या भावात गडगड होण्याची चिन्हे आहेत. त्यातच जो बायडेन यांची सौदी भेट यशस्वी ठरल्यास आणि द्विपक्षीय तणाव कमी झाल्यास, तेलाचे भाव आणखी उतरतील आणि अमेरिकेत कडालेला ९.१ टक्के हा महागाईचा उच्चांकी दर उतरू लागेल. मग जगामध्ये स्थैर्य येईल आणि ते भारताच्या पथ्यावर पडेल.

रशिया-युक्रेनने सामोपचार केला आणि तेलाचे भाव कमी झाले तर ठीक. नाही तर घसरणाऱ्या चलनामुळे महागाईची तीव्रता वाढू नये. म्हणून भारतीय चलनात आयात व निर्यात करण्याच्या दृष्टीने रिझर्व्ह बँकेने नुकतेच पाऊल टाकले आहे. त्या माध्यमातून रशिया, इराण यांच्याशी व्यापार संबंध वाढवण्यासाठी आणि या देशांकडून होणाऱ्या तेल आयातीचा उपयोग त्यांची गुंतवणूक वाढवण्यास होऊ शकेल. गडगडता रुपया हे महागाईच्या दृष्टीने संकट असले, तरी निर्यातदारांना ते वरदान ठरते. गेल्या वर्षात भारताच्या उत्पादन क्षेत्रात निर्यातीत घसघशीत वाढ होऊन, ४१८ अब्ज डॉलरवर ती पोहोचली. त्यात अधिक गतिमानता अपेक्षित आहे.

भारतीय भांडवल बाजार सध्या गुंतवणुकीसाठी आकर्षक टप्प्यावर आहे. जगात स्थैर्य आल्याबरोबर भारतात गुंतवणुकीचा प्रवाह पुन्हा जोर धरेल. इतक्या संकटकाळातही भारतीय अर्थव्यवस्था जोमदार वाटचाल करीत आहे. या टप्प्यावर भारतीय रुपयातील गडगड थांबून प्रथम स्थैर्य आणि नंतर वाढ या दिशेने वाटचाल होण्याची शक्यता आहे. ♦



## हितगुज १०० अंक बालगोपाळांसाठी
## पक्षी-प्राणी विषयक मनोरंजक माहिती



३३. वाघांचे उगमस्थान सायबेरिया आहे.

५१. प्राण्यात सर्वात जास्त आयुष्य कासवाला आहे.

५२. जगामध्ये पक्षांच्या ८६५० जाती आहेत त्यातील १२०० भारतात आहेत.

५३. एक घुबड ३० मांजरे जेवढे उंदीर मारतात तेवढे एकटे मारते त्यामुळे भारताच्या शेतीला ते महत्त्वाचे आहे.

५४. कोआला (छोटे अस्वल)चे पिल्लू जन्मतः एका द्राक्षाएवढेच मोठे असते. कोआला फक्त निलगिरीची पाने खाऊन जगतो.

५५. जगामध्ये माकडाच्या सुमारे १२५ जाती आहेत.

५६. पांडा दररोज ९ किलो (कोवळा) बांबू खातो.

५७. मृत समुद्रात खूप मीठ असल्याने मासे नाहीत.

५८. जगात सर्वात वेगाने उडणाऱ्या पक्षाचे नाव 'व्हाईट' असे असून तो ताशी १५० किमी वेगाने उडतो.

५९. गेंटू पेंग्विन हा सर्वात जलद पोहणारा असून तो ताशी २७ किमी वेगाने पोहतो.

६०. ग्रे हाउंड हा शिकारी कुत्रा फक्त ३ उड्यात ताशी ४५ मैल (७२ किमी) वेग पकडतो.

**प्रेषक श्री. मोहनराव मराठे (पृ. ३६५), खार**
भ्रमणध्वनी : ९८१९९६४७६५

# मूर्तीभंजक मुस्लिमांच्या मशिदी हिंदूंनी नष्ट केल्या नाहीत, म्हणून...

• डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०), वडाळा दूरध्वनी – ९८२०२३२०८२

**पो**थीतल्या कोष्टकाप्रमाणे सांगितलेला सद्गुण हा देशकालपात्राचा विवेक न करता, तारतम्य आणि परिस्थिती याचा विचार न करता आचरणात आणला तर तो दुर्गुण ठरू शकतो.

दिधले दुःख पराने उसने ठेवू नयेचि फेडावे।
शिक्षा देव तयाला करील म्हणोनि उगे न बैसावे।।

याप्रमाणे वागावे उगे बसून सोसणे हा शहाणपणा नाही. दुबळेपणा आणि बावळटपणा न करण्यात खरे शहाणपण आहे. अन्यायाला प्रतिकार करून, अत्याचाराला प्रत्याचाराने उत्तर देण्यात मानव समाजाचे कल्याण आहे.

### हिंदुची धार्मिक बुद्धिभ्रष्टता

परमधर्मसहिष्णुता कोणाशी, तर जो 'परधर्म' आपल्या स्वधर्माशीही सहिष्णुतेने वागणारा असेल कप परधर्मसहिष्णुता योग्य आहे पण हिंदुधर्माचा निर्दय विनाश, काफरांचा भयानक उच्छेद हाच मुस्लिम आणि ख्रिश्चनांनी त्यांचा धर्म मानला तिथे त्या 'परधर्माचा' त्यांच्या असहिष्णु कृत्यांचा अत्याचाराने प्रतिशोध घेणे हाच हिंदूंचा धर्म ठरतो. पण दुर्दैवाने हिंदूंनी हा धर्म पाळला नाही, याची इतिहासात अनेक उदाहरणे सापडतात.

प्रत्येक मुस्लिम आक्रमकाने मथुरेची आणि काशीची मंदिरे उद्ध्वस्त केली. रामेश्वर, सोमनाथ मंदिरातील मूर्ती दिल्लीच्या प्रासादांच्या पायऱ्यात चिणून टाकल्या. हिंदूंच्या भावनांना पायदळी तुडवून टाकण्यासाठी पवित्र मूर्ती शौचालयासाठी वापरल्या. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या शब्दात सांगायचे झाले तर, मुस्लिमांनी हिंदूंवर अशा प्रकारचे अनेक 'अमानुष उत्पात' केले. परंतु हिंदूंनी हाती राजसत्ता आल्यावरही, काशी, मथुरा ते रामेश्वर येथील मुस्लिमांनी बांधलेल्या मशिदींना भरडून काढून त्यांच्या अवशेषांना अशाच मार्गामार्गातील फरशांमध्ये चिणून टाकून सद्गती दिली नाही. हिंदूंनी मुसलमानांनी पाडलेली मंदिरे पुन्हा उभारली पण याहून आश्चर्यकारक उदाहरणे अशी आढळतात की, हिंदूंच्या अशा सत्ताकाळात त्यांनी त्या मुस्लिम आक्रमकांनी बांधलेल्या अशा मशिदींना नवीन उत्पन्ने लावून दिली आणि त्या मशिदींचे रक्षण करण्याचे दायित्व आपणांकडे घेतले!

### हिंदूराजांची परधर्मसहिष्णुता आणि औदार्याचे प्रदर्शन

महमंद गझनीने सोमनाथाचे देवालय पाडल्यानंतर तो प्रदेश हिंदूंनी पुन्हा जिंकून घेतला आणि सोमनाथ देवालय पुन्हा बांधले. त्यानंतर पुन्हा मुस्लिम आक्रमण होऊन देवालय पाडले, पुन्हा सत्ताधारी हिंदुराजांनी ते देवालय अगदी विधिपूर्वक उभारले. त्या क्षेत्राचीही चांगली भरभराट झाली. त्या सागरतटावर पूर्वीपासून येती-जाती-अरबी नाविक व्यापाऱ्याची तारवे प्रवासाचा एक टप्पा म्हणून उपयोग करीत असत. वस्तुतः त्या हिंदुराजाने ह्या अरबांनाच त्या समुद्रात येणे बंद करावयास पाहिजे होते. कारण या अरबी व्यापाऱ्यांच्या मागे त्यांच्या अरबी सेनाही आलेल्या होत्या; असा कटु अनुभव त्या हिंदुराजांना वारंवार आलेला असतानाही, स्वतःच्या परधर्मसहिष्णुतेचे आणि औदार्याचे प्रदर्शन करण्यासाठी त्या हिंदुराजाने त्या अरबी व्यापाऱ्यांचे त्या तटास येणे-जाणे बंद केलेच नाही, तर उलट त्यांना अगदी आपल्या घरीच आल्यासारखे वाटावे इतक्या सौजन्याने वागविले. तेव्हा या हिंदुराजाच्या चांगलेपणाचा फायदा घेऊन अरबी व्यापारी लाडात न आले तरच आश्चर्य! त्यांनी वरवर गोड बोलून त्या हिंदुराजाकडून नवी मशीद उभारण्याविषयी विनंतीपूर्वक प्रस्ताव मांडला. भोळसट हिंदुराजांनी त्यांचा कपटपटुत्वाचा कावा न ओळखता, मशीद उभारण्याला मोठ्या आनंदाने मान्यता दिली आणि सोमनाथ मंदिरासमोरच एक नवी मशीद-हिंदुधर्माला मूर्तिमंत आव्हानासारखी ताठ मान करून उभी राहिली.

### आत्मघातक परधर्मसहिष्णुता

वस्तुतः महमंद गझनीने त्या सोमनाथ मंदिराची जी दुर्दशा केली ती आठवून, त्या हिंदुराजाने मशिदीवर नांगर फिरवावयास हवा होता आणि मग सोमनाथाचे मंदिर पुन्हा बांधावयाचे होते. परंतु नवीन मशीद बांधून तिच्या वर्षसनाचीही सोय केली. ह्या हिंदुंच्या आत्मघातक परधर्मसहिष्णुतेचे सद्गुणविकृतीचे फळही त्यांना या हाताचे त्या हाती लगेच भोगावे लागले.

### उपकाराची फेड अपकाराने

काही काळानंतर जेव्हा अल्लाउद्दिनादि मुस्लिम आक्रमकांनी गुजराथवर स्वाऱ्या करून सहस्रावधि हिंदू पुरुषांची सरसकट

कापाकापी केली, स्त्रियांवर बलात्कार केले आणि शतावधी हिंदू मंदिरे पाडीत फोडीत अत्याचारी मुसलमानी सैन्ये त्या सोमनाथाच्या मंदिराजवळ आली, तेव्हा हिंदुराजांनी ज्या अरबी व्यापाऱ्यांना मोठ्या प्रेमाने नवी मशीद उभारू दिली त्या हिंदूंच्या परधर्मसहिष्णुतेची फेड कशी केली? तो हिंदूंचा उपकार कसा फेडला?

तर, तो उपकार हिंदूंच्या बावळटपणाचे, दुधखुळेपणाचे लक्षण समजून, त्या उपकाराची फेड अपकारानेच केली. सोमनाथ मंदिर छिन्नविछिन्न करून टाकले आणि महंमद गझनी जे करावयास विसरला होता ती विटंबना त्याने सोमनाथच्या मूर्ती आणि गाभाऱ्यातील शिला दिल्लीला नेऊन तेथील मशिदीच्या पायऱ्यांत चिणून टाकल्या.

गुजराथवर म्लेंच्छांचे चिरकालिन सार्वभौमत्व स्थापिले गेले. सुलतान अहमदशाह, इत्यादि मुसलमानी सुलतानांनी सशस्त्र धार्मिक अत्याचारांनी, स्त्रियांवरील बलात्कारांनी आणि मंदिरांच्या विध्वंसांनी गुजराथमधील यच्चयावत् हिंदु समाजाला त्राहि भगवन् केले. सोमनाथाचा पत्ता पुन्हा नाहिसा झाला, पण ती मशीद नि तिचे महत्त्व वाढतच गेले. जुन्या मशिदी तर सुरक्षित राहिल्याच, हिंदुराजांनी त्या पाडल्या नाहीत, मुसलमान सुलतानांनी उलट त्या जुन्या मशिदीचे वैभव तर वाढविलेच, पण नवीनही एकाहून एक उंच नि विस्तृत अशा मशिदी उभारल्या.

**औदार्यसद्गुण विकृती**

हिंदूंच्या धार्मिक बेशुद्धीचे, सद्गुण विकृतीचे, आंधळ्या परधर्मसहिष्णुतेपायी स्वधर्माचा बळी देणाऱ्या आत्मघातकीपणाची अशी उदाहरणे काश्मीरपासून रामेश्वरापर्यंत, पावलोपावली आणि शतकानुशतके त्या मुस्लिम आक्रमणाच्या काळी घडत होती.

सिद्धराज हा गुजराथेतील अनहिलवाड्याचा एक पराक्रमी राजा, न्याय अन्यायाचा भोक्ता, अर्थात् न्याय आणि अन्याय स्वधर्म आणि परधर्म, औदार्य आणि संकुचित्व इत्यादी सर्व गुणांना देशकाल, पात्रापात्रविवेकाचा स्पर्शही न करता तो गुण स्वयमेवच सद्गुण अशा भ्रांतीने वेडावलेला हिंदुराजा होता.

महंमद औफी हा मुसलमान लेखक आमजयामी-उल-हिफायत या पुस्तकात लिहितो की –

''अनहिल वाड्याच्या राज्यात एकदा मुसलमानांवर काफर हिंदूंनी चढाई केली आणि त्या दंगलीत ऐंशी मुसलमान ठार मारले गेले आणि तेथील त्यांची मशीद जाळून टाकून मिनारही पाडून टाकला. तेव्हा तेथील इमाम खातीब अल्ली याने त्या हिंदुराजाच्या स्तुतिपर एक मोठी कविता रचली आणि त्या कवितेत मुसलमानांवर हिंदूंनी केलेल्या त्या अत्याचाराची माहिती गोविली आणि हिंदूंपासून आमचा बचाव व्हावा, म्हणून विनंती केली. ह्या कवितेचा आणि आवेदनाचा हिंदुराजावर एवढा प्रभाव पडला की तो स्वतः गुप्तरीतीने त्या दंगलीचे गावी जाऊन चौकशी करून आला आणि त्या चौकशीतून निष्पन्न झाले की हिंदूंकडून मुसलमानांना मारहाण पुष्कळ झाली.

आता राजाने उदार असावे, न्यायदानात स्वपक्ष, परपक्ष काही पाहू नये, त्यातही आपल्या हिंदुराज्यात जे बिचारे अल्पसंख्य परधर्मीय राहतात त्यांना अधिक सवलती देऊनही परधर्मसहिष्णुतेचे ब्रीद पाळावे, हा राजधर्म आहे. ही पोथ्यापुराणातील सर्वसाधारण वाक्ये त्याची पाठ झालेली होती. पण त्या वाक्यांना देशकाळपात्राच्या कोणत्या उपनेत्रांतून वाचले पाहिजे. हा गुरुमंत्र राजांना सांगणारी चाणक्यसूत्रे मात्र त्या राज्याच्या सात पिढ्यात कोणी वाचली नसतील असे दिसते. कारण त्या तथाकथित अत्याचारांविषयी हिंदूंना कठोर दंड देऊन त्या हिंदुराजाने मुसलमानांना एक लक्ष बलोत्रा नाण्याची मोठी रक्कम दिली आणि तो मिनार पुन्हा बांधून दिला.

...ह्या राजाने, जयसिंगाने पुनरूद्धार केलेल्या सोमनाथाची, स्वतः पायी यात्रा केली होती. तो शिवभक्त होता आणि हिंदुधर्मावर त्याची नितांत भक्ती असे. म्हणूनच बहुधा मुसलमानांसारख्या कट्टर नि कपटी शत्रूंना आपल्या राज्यातून हुसकून लावण्याच्या ठिकाणी किंवा त्यांना बळाने हिंदू करून घेण्याच्या ठिकाणी त्याने त्या मुसलमानांच्या मशिदी, सोमनाथचे मंदिरच नव्हे, तर गुजराथेतील शतावधी मंदिरे आणि हिंदुस्थानातील सहस्त्रावधी मंदिरे फोडून तोडून टाकणाऱ्या मुसलमानांच्या मशिदी हिंदूंच्या खर्चाने पुन्हा बांधून दिल्या आणि त्यांना आपल्या राज्यात परधर्मसहिष्णुतेच्या आणि औदार्याच्या हिंदुब्रीदाप्रमाणे विशेष सरंक्षण दिले.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी 'भारतीय इतिहासातील सहा सोनेरी पाने' या ग्रंथात वर वर्णन केल्याप्रमाणे आत्मघातकी क्षमा मुस्लिमांना दाखविल्यामुळेच आजही मुस्लिम मूर्तिभंजक जमेल तसा मंदिरांचा आणि मूर्तींचा विध्वंस करीत आहेत!

साऱ्या जागतिक सत्तांच्या केवळ पोकळ शाब्दिक विनंती लाथाडून तालिबानने महाप्रचंड बुद्धमूर्तीचे चूर्ण करून टाकले!!

या प्रत्यक्ष अनुभवावरून तरी हिंदुशक्ती सावध आणि कृतिशील होणार आहेत काय?

**संकलन : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे**

♦

# सहज सुचलेले मुक्त लेखन

• प्रा. संजय रामचंद्र मराठे (पृ.४१६), अमरावती भ्रमणध्वनी – ९४२१७४०८९४

०१

दीडवर्षापासून व्हॉटस्‌ॲपवर विविध ग्रुप्सवर लेखकाचे नाव नसलेल्या ५/१० अलक (अती लघु कथा) फिरून फिरून फॉरवर्ड होत आहेत. काही सुंदर अलक नी मला भुरळ घातली आणि मला अललेची (अति लघु लेख) कल्पना सुचली. यात कथानकाची उणीव असल्याने हे अलक नाही. मी ४/५च्या तुकड्यात काही अलले व्हॉटस्‌ॲपवर टाकले पण काही कालावधी नंतर माझे नाव वगळून मलाच ते बुमरँग प्रमाणे परत येऊ लागले. म्हणून २०२०च्या दीपोत्सवमध्ये मी ते प्रसिद्ध करायचे ठरविले. आश्विन अधिक मास असल्याने प्रेम, नाटक/सिनेमा/मालिका, निसर्ग, सामाजिक मानसशास्त्रीय, शैक्षणिक, साहित्यिक अशा तीस तीन म्हणजे तेहतीस विविध वाणांच्या रूपात हा अलले संग्रह सादर केला आहे.

०२

सृजनात्मक शक्ती, निर्मितीसाठी प्रेरणा देते. कला आणि विज्ञान ह्या दोन्हीच्या विकासासाठी सृजन कारणीभूत आहे. ध्यानाच्या माध्यमातून अनेक चमत्कार दृष्टोत्पत्तीस येतात. निर्गुण निराकार ध्यान समाधीचा मार्ग आहे. सहेतुक ध्यानाने सृजनशक्तीचा विस्फोट साधता येतो. या स्फोटातून उन्मनी अवस्था साध्य होते. अंतःकरणात कलाकृतीचे बीज अंकुरीत होण्याचा साक्षात्कार होतो. याला विचार आणि कृतीची जोड मिळून अंतःकरणातून मनात कलाकृतीची गर्भधारणा होऊन कलाकृतीच्या अंतीम स्वरूपाची अनुभूती येते आणि कलाकृतीची निर्मिती वेग घेऊ लागते. कलाकृतीच्या कलाविष्कारातून पूर्तीची तृप्ती, धारणेत विकसीत होऊन क्षणमात्र समाधीच्या अनुभवाचे तरंग उठतात. या तरंगातून पुन्हा नवीन सृजनात्मक शक्तीच्या निर्मितीचे आवर्तन साकार होऊ लागते. पुन्हा नवीन कला आणि विज्ञानाला पोषक वातावरण तयार होते.

०३

साहित्य हे केवळ सामाजिक कारणांचा परिणाम नसतो. तर ते सामाजिक परिणामांचे कारण ही असू शकते. फ्रेंच राज्यक्रांतीस अनेक साहित्यिकांचे उद्‌बोधक लेखन ही कारणीभूत होते. दलित साहित्य हे सामाजिक परिणामाचेच फलित आहे. असेच काहीसे व्हॉटस्‌ॲप आणि फेसबुक वरील स्माईली आणि इतर रेडिमेड चिन्हे, चित्रे यांचा मुक्त वापर करून शब्द आणि व्याकरणाची तोडफोड करणाऱ्या नविन प्रकारच्या साहित्याचा जन्म झाला आहे. समाजमनावरील संस्कार आणि संस्कृति ह्यामुळेही नवीन उपहासात्मक साहित्याची रेलचेल दिसून येते. ब्लॉगस्, वॉलस्, इन्स्टाग्रामस् ह्यांनी चौकातील वार्ताफलकांची जागा बळकावली आहे. शाब्दिक वाङ्‌मयीन वादविवादाची जागा पोस्टरवॉल्स बळकावू पाहते आहे.

०४

सिनेमा, नाटक, मालिका ह्या प्रायोगिक आणि व्यावसायिक कलांच्या सीमारेषा पूर्वी स्पष्ट असत. आता ह्या दोन्हींना एकच छान मुलामा मिळतो, तो जाहिरातीमुळे प्राप्त व्यवसायाचा. व्यावसायिक म्हणजे प्रोफेशनल कला मार्केटींग करू लागल्या की व्यावसायिक कलांचा व्यवसाय होतो. हौशी कलासुद्धा अमॅच्युअर न राहता प्रोफेशनली व्यवसाय करताना दिसतात. मराठी वाहिन्यावरील मालिकांच्या मालकांनी प्रायोगिक, व्यावसायिक ही दरीच संपुष्टात आणली आहे. ललित साहित्यात भावनांचे आरोह अवरोह टिपले जातात, तर ललितेतर साहित्याचा सर्व भार आणि भर ज्ञानात्मक अशा विचारांच्या सुसंगत व सुस्पष्ट अशा मांडणीवर असतो, हे सर्व आता, व्यवसाय कसा आणि किती झाला ही फुटपट्टी ठरवते!

०५

सुधारणा, बदल म्हटले की बंद, मोर्चे ओघाने यायला लागलेत. यांची परिणीती दंगे, जाळपोळ आणि धार्मिक व जातीय रंगांच्या उधळणीत होत जाते. या हिंसक कार्यवाहीला उत्तेजनाची चरमरीत फोडणी देणारे ही असतात. तापलेल्या तेलात तडतडणारी मोहरीही असतेच. पण तापलेल्या तेलात मोहरी टाकून तडका देणारे हात मात्र नेहमी दुसरेच, सदैव पडद्यामागेच असतात. मोहरीला वाटते आपण मोहरे आहोत, पण ती प्यादी असते हे तडतडून फुटल्यानंतर करपल्यानंतर उमजते आणि त्या मोहरीचे अस्तित्व संपते. बंद, मोर्च्यासाठी पुन्हा मोहरीचे पीक येतच राहते. बंद आणि मोर्चापूर्वीच शिधा आटा, मीठ मोहरीची बेगमी जुळवणारे ही मिळतात. पैसा फेकला की आपल्याकडे

काहीही मिळते अगदी रस्त्यावर फेकायला कांदे, टमाटे आणि दुध सुद्धा.

०६

प्रतीक आणि प्रतिमा ह्यांना भक्तीयोगात महत्त्वाचे स्थान आहे. प्रतीक सिंबॉल आहे. प्रतिमा अस्तित्वात दिसू शकत नसणाऱ्या निर्गुण निराकार ईश्वरावर लक्ष केन्द्रीत करण्यासाठीचे ईश्वराचे कल्पनाचित्र, संकल्पचित्र. प्रतीकाचे सोपे उदाहरण म्हणजे, सामान्य ध्वज आणि राष्ट्रध्वज. राष्ट्रध्वज जरी सामान्य ध्वजच असला तरी आपण तो राष्ट्रध्वजाचे प्रतीक म्हणून स्विकारल्याने त्याला अनन्यसाधारण महत्त्व येते. नाहीतर विठ्ठला कोणता झेंडा घेऊ हाती अशी अवस्था होते. मी राहूल सावरकर नाही हा सावरकरांच्या अपमानापेक्षा सावरकर ह्या प्रतिकाचा अपमान आहे. विचारधारा प्रतीक असते तर पुतळा किंवा फोटो ह्या प्रतिमा होत. मुर्ती फोडल्या, देवळे पाडली तरी ईश्वर हे प्रतीक मनातून कधीच नष्ट होत नाही. कल्पना शक्तीतून विविध प्रतिमा साकारता येतील. प्रतीकासाठी विचारधारा, ज्ञान, जाणीव, चिंतन वगैरे वगैरे बरेच काही लागते.

०७

सुचणे एक कला एक चान्स, मनात येणे म्हणजे सुचणे असावे का? सुचलेले क्षणिक असते हे क्षण जपून ठेवायला हवेत. त्यांना शब्दबद्ध किंवा कृतीबद्ध करण्यातून सुबक मांडणी करणे, सुचलेल्याला मूर्तरूप देणे, कालातीत असू शकते. ह्यासाठी मातृभाषा आणि संस्कार महत्त्वाचे साधन आहे. ज्या भाषेत आनंद आणि आकांत मांडता येतो ती मातृभाषा अनुभवांना चिरस्थायी रूप देऊ शकते.

०८

बिंब प्रतिबिंब, रूपप्रतिरूप अगदी डिटटो म्हटले तरी फरक असतोच, प्रतिबिंब पडते प्रतिरूप साकारते. कवडसा ही उजेडच असतो. प्रकाशाचा उजेड पडतोच, पण कवडश्याचे सांगता येत नाही. त्यासाठी आणखीन काहीतरी लागते. कवडश्याचे अस्तित्व मात्र प्रकाशामुळेच. उजेड भोवतालच्या अंधारामुळे जाणवतो. छाया मात्र उजेड आणि कवडसा दोघांनाही साथ देतात. संध्याछाया आणि संधी प्रकाश मात्र काहीतरी वेगळेच सुचवतात. आरश्यात रूप दिसतं पण ते सत्य असतंच असं नाही. त्यात डावे उजवे होते. बघतोय तो पर्यंतच त्यात डोकावता येत. प्रतिबिंब नितळ, स्थिर पाण्यात उमटतं. प्रतिरूप, प्रतिबिंब उठून दिसण्यासाठी प्रकाश, उजेड, कवडसा काहीतरी मात्र लागतंच. माणसाच्या अंतरंगाचे प्रतिबिंब गुढ असते ते पडत नाही तर दिसते म्हणतात.

०९

अलले नवीन साहित्य प्रकार आहे. जोपर्यंत समिक्षकरूपी टीकाकार त्यावर पदरचे घालून भाष्य लिहीत नाहीत, तोपर्यंत त्याला दर्जा आहे किंवा तो घसरला आहे, असे मानता येणार नाही. साहित्याला दर्जा असतो आणि टीकाकारांच्या घसरवण्यानेच तो खरा उंचावतो, असे म्हणतात. नाहीतर लेनपूलचे पुस्तक एवढे गाजलेच नसते. टीका लिखित, शाब्दिक किंवा कृतीतून व्यक्त करण्याचा अधिकार आपल्याकडे सर्वांना आहे. त्यासाठी भाषातज्ज्ञ, सुशिक्षित आणि अभ्यासू असण्याची गरज नाही. एवढेच नव्हे तर ते लेखन वाचण्याचीही गरज नाही हे लेनपूल आणि नागरिक सुरक्षा सुधारणा कायदा ह्यांनी सोदाहरण स्पष्ट झाले आहे.

१०

सान्निध्यातून संपर्क, संपर्कातून जवळीक, जवळिकीतून आपुलकी, आपुलकीतून प्रेम, प्रेम म्हटले की आणाभाका, घरी सांगणे. न ऐकल्यास पळून जाणे सैराट. नाहीतर ब्रेकअप किंवा झुरणे. सफलता पदरी पडल्यास नांदणे. मग भांडणे पुन्हा ब्रेकअप नाहीतर निभावणे. ह्याला जीवन ऐसे नांव. प्रेमाला उपमा नाही, कांदेपोहे पुरतात. ते लग्न जुळवतात त्यातूनही प्रेम फुलते साकारते. कोणी नुसतेच निभावतात त्याला जुलुमाचे असेही म्हणतात.

११

दिवस संपतात. दिवस जातात. दिवस गेले हा भूतकाळ एका अर्थी वर्तमानकाळ बनतो. त्याची परिणिती नवीन जन्माच्या भविष्याचे वर्तमान बनून येते. काही दुःखद प्रसंगोपरांत दिवस घालवतात. दिवस सुखाचे तसे दुःखाचेही असतात. रात्रीचं असं नसतं. रात्र तशीच सरते. कधी कधी काळोखीही ठरते. रात्र वैऱ्याचीही असते. रात्री सर्वच झोपतात. रात्री नंतर उजाडते असा आशावाद सदैव जागा असतो. दिवस आणि रात्रीला सांधणारा संधीकाळ क्षणिक असतो. सकाळ प्रसन्न, झुजुमुंज संध्याकाळच्या नशिबी कावरेबावरेपणा परिस्थिती चिकटवते!

१२

श्रद्धा, अंधश्रद्धा आणि मनःशक्ती हा वेगळाच त्रिशंकू आहे. ह्यांच्यातला थ्रेशोल्ड म्हणजे पुसटश्या रेषा ओळखता येणे ज्यांना जमले तो तरला, अन्यथा बुडला. श्रद्धापूर्वक भक्ती मनःशक्तीला पुरक. भक्ती जर अंधश्रद्धेने केली तर मनस्ताप आणि विचका. आधी हा त्रिशंकू जाणणे आणि त्यांच्या ठळक रेषा मनःपटलावर उमटवणे आवश्यक. बिटविन द लाइन्सचा उपद्व्याप नंतरचा. पुसट रेषा ओळखणे तर आणखीनच नाजूक.

अंधश्रद्धा निर्मुलन वाले ती दूर होईल अशी श्रद्धा ठेऊनच कशाला तरी खतपाणी घालतात आणि श्रद्धेचे विकृत रूप म्हणजे अंधश्रद्धा हे विसरतात. ते अंधश्रद्धेकडे प्रतीक म्हणून पाहतात आणि स्वतःच्या प्रतिमा पुजतात. मुळात श्रद्धा हेच खरे प्रतीक आहे हे ह्या अंधाना कोण सांगणार? ह्यांनाच श्रद्धा आणि अंधश्रद्धेतल्या पुसट रेषा ओळखता येत नाहीत. त्यामुळे त्यांना मनःशांती न मिळता त्यांची शारिरीक शक्ती ते उगाच खर्ची घालतात.

१३

आजच्या दुरचित्रवाणी क्षेत्रातील मराठी मालिकांच्या संहिता आणि संवाद लेखना बाबत सामाजिक मूल्ये, कला मूल्ये, जीवनमूल्ये हे जरा गौण झालेत की काय? ही वास्तविकता, शंका की खंत हे ह्या तद्दन मालिका पाहणाऱ्यांनीच ठरवावे, त्यातून कलाकारांना वगळलेलेच बरे. त्यांच्याकडे हातचे सोडून पळत्याच्या पाठीमागे लागण्या इतके धैर्य नसते. एखादी मालिका कामाच्या व्यापामुळे ते करार मोडून सोडतीलही, पण त्या मालिकेतून मांडलेला विचार आणि त्याचे करावे लागणारे समर्थन आणि प्रगटीकरण पटत नाही हे सांगून मालिका सोडण्याचे धाडस ते दाखवत नाहीत. दुधात पाणी घालून ते वाढवणे ठीक पण त्याला मर्यादा असावी. दुर्दैवाने टीआरपी हंस नसतो. दूध आणि पाणी ओळखण्याची त्याची क्षमता असते का? हाही प्रश्नच आहे. माझा हात भारी, लाथ भारी प्रमाणे जाहिरातदार आणि सोशिक प्रेक्षक यांचे सर्वच लयभारी. पण रिमोट आपल्या हाती नसतो. दिवाणखान्याचा उंबरा ओलांडण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो. उंबरठा ओलांडून सोकॉल्ड मराठी कौटुंबिक मालिकांनी मात्र घर डोक्यावर घेतलेले असते.

१४

आत्म्याशिवाय जिवंत शरीराची कल्पनाच करता येत नाही. पण हा शरीरात समाधान मानत नाही. कलाकृतीत धुडगूस घालून तिलाही हा जिवंत करतो. हा मुक्त असतो म्हणतात तरीही याला कोणीतरी लागते नाहीतर हा भटकतो, हरवतो, अडखळतो, ठेचाळत कुणालाही केंव्हाही धरतो, पकडतो, त्याच्यात घुसतो. याला बदल आवडतो शरीर बदलतो. हा चंचल असतो कवच मिळाले की स्थिरावतो हा समज खोटा आहे. याला उडताही येते. याचा वशिला खूप आहे. थेट परमेश्वराशी भिडतो. तृप्तही होतो म्हणतात.

१५

पाऊस पडतो पण त्याला लागत नाही. इतरांना मात्र तो झोंबतो, लागतो. थंडी वाजते, पण ऐकू येत नाही. तिच्या आवाजाने ध्वनी प्रदूषण होत नाही. हुडहुडी भरते, वाहून जात नाही उन चढतं, उतरतं, उठत नाही, उभे राहत नाही अन थांबतही नाही. जांभई येते, डुलकी लागते. दोघींचा पेंगण्याशी संबंध असतोच असे नाही. ताप, डोके, मस्ती, माज, जिना किंवा लिफ्ट शिवाय चढतात आणि उतरताही. 'सब्र' फळझाड नसले तरी त्याचे फळ गोड असते म्हणतात. आनंद, सुख, समाधान, शांती मिळते पण भाव आणि दुकान यांचा पत्ता नसतो.

१६

नाण्याला दोन बाजू असतात, खरे आहे. त्याला कडाही असते. आंधळे जाडी वरून नाणे ओळखतात. कडांना उगाच कंगारे ही असतात. नोटांचे सारेच विचित्र असते. नोटबंदीने अनेक कडा पाणावल्या, कंगोऱ्यांना भाले फुटले, अनेक नाणी खुर्दा झाली.

१७

भावना! कोण ही भावना? भावना की कल्पना! कल्पना केलेली बरी की भावना जाणून घ्यावी? प्रश्न असा आहे की भावना पोहोचेल का? कल्पनाच केलेली बरी. कल्पनेवरून भावना कशी समजेल? भाव भावना की भांबावना अशी मनाची स्थिती असतांना वेगळीच कल्पना सतावते! या दोघींचा संबंध असेल का? कोण दोघी? कल्पना आणि भावना, की भाव-भावना आणि भांबावना! भावना खरी की कल्पना? कल्पना खरी कशी असेल? ती तर कल्पना, ती केलेली बरी. बुचकळ्यात पडलोय, कारण या मला सांगून आल्या आहेत लग्नासाठी स्थळ म्हणून.

१८

प्रेम असो की राग यांना कारण लागत नाही, प्रेम कोणत्याही क्षणी होते. त्यासाठी गाफील क्षणाची गरज नसते. राग विनाकारण येतो हे पटत नाही पण कधी कधी तो का आणि कशाचा येतो, हे ही सांगता येत नाही. इथे गाफील राहून चालत नाही, घात ही संभावतो. जसे अपघाताने प्रेम होते.

१९

असंबद्ध बोलायला अक्कल लागते का? शाळेत स्पर्धा होती पाच मिनिटे बोलून उगाच जिंकलो असे वाटले. असंबद्ध बोलणेही बोधप्रद असते हे प्रथम क्रमांकासाठी झालेल्या वाद विवादाने कळाले.

२०

शकुन की अपशकून? पहिल्यांदा कावळा शिवला की कुमारीची किशोरी आणि (पिंडाला) शिवला नाही तर रुखरुख.

कावळा बदलला की संदर्भ बदलतो. तसेच शकुन अपशकुन. पुढच्याला ठेच मागचा शहाणा. अपशकुन उगाच बदनाम, कावळ्याचे नशीब दुसरे काय!

२१

मनाला अस्तित्व असो वा नसो, त्याचे निवासस्थान मानवी शरीरात आहे असे मानण्याचा प्रघात आहे. शरीरशास्त्रामध्ये मात्र त्याच्यासाठी जागा निश्चित आणि निर्धारीत नाही. मनास विक्षेप असतात. ते बसतं, उडतं, खट्टू होतं, व्यापार करतं, हळवं असतं, आणि बनवतं सुद्धा. मुर्ख, भित्रा, पोपट, काटक, कठोर, निर्दयी असं काहीही बनवण्याची हातोटी त्यालाच साधते. शिक्षक असल्याप्रमाणे धडा शिकवण्यापासून प्रेम करण्यापर्यंत मन आपल्याला शिकवते. ते स्वतःशीच बोलतं सुद्धा तरीही ते मुकं असतं असे उगाचच म्हणतात त्याला उपमा नाही, लांबी रुंदी जाडीही नाही तरी त्याला बिंदुच्या व्याख्येत बसवता येत नाही. मन आपल्याला खातं. मन जाणणं येरागबाळ्याचे काम नाही. असो सर्व मनाचे खेळ म्हणून मनातल्या मनात मनाचे मांडे खाऊन सोडून देऊ.

२२

महाराष्ट्रातील २०१९ च्या विधानसभेच्या निवडणुकीच्या आधी आणि नंतर पायरी, पातळी, लेव्हल या शब्दांचे अर्थ लावतांना राजकीय सारीपाटावरील अध्यक्ष, नेता, पक्षप्रमुख राज्यपाल, मुख्यमंत्री, पक्ष नेता, उप मुख्यमंत्री या सर्व सन्माननीय शब्दांबद्दल मान, सन्मान, आदर या शब्दांचे मतितार्थ उघडे पडले, बिटविन द लाईन्स पेक्षा बिटविन द वर्डस ॲण्ड अल्फाबेट्स गवसल्या सारखे झाले.

२३

अरेला कारे, म्हणजे आरेतली झाडे कारे तोडलीत, हे झाडे तोडल्यानंतर म्हणायचे या अर्थी नव्हे, तर साधी पर्यायी नैसर्गिक कृती या अर्थाने लिहिले आहे. जसे सादाला प्रतिसाद, क्रियेला प्रतिक्रिया असे, या मध्ये न्युटनचा गती विषयक तिसरा नियम सोडल्यास विरोध असतोच असे नाही. प्रतिसाद, प्रतिक्रिया, कारे यांना पूर्तता आणि जोर येण्यासाठी साद, क्रिया, आरे असा पूर्वपक्ष असणे आवश्यक आहे. या अर्थाने प्रतिचार ह्याचा पूर्वपक्ष काय असेल? चार कि चौघं, कारण प्रतिचार हा चारचौघांचा असतो. विरोधाला विरोध करायला काही प्रतिबंध असण्याचे कारण नाही. कारण प्रतिबंध हा बंध चा उत्तरपक्ष नसतो. तो स्वतः प्रति शी बद्ध असतो. विरोध, निरोध, उपरोध, अवरोध यांच्या पूर्वपक्षाचा शोध घ्यायला कोणी प्रतिबंध करण्याचे कारण नाही.

२४

कावळा बसतो, फांदी मोडते, ह्या कृतीतुन वेगळीच निष्पती होते, ती म्हणीत बसते किंवा वाक्प्रचारात मोडते. नाव सोनुबाई हिच्या हाती कथलाचा वाळा म्हटल्याने सोनुबाईच्या भावना दुखावल्या म्हणून कथीलाची भांडी दागिना या अर्थी वापरणाऱ्यांनी मोर्चा काढला पाहिजे आणि कथीलाचे का होईना पण मिळवलेले पुरस्कार परत करण्याच्या घोषणा केल्या पाहिजेत. माणसं दुखावतात या म्हणीची अभिव्यक्ती स्वतंत्र असल्याने तिच्यावर गदा येऊ शकते. म्हातारी मेल्याचे दुःख नाही काळ सोकावतो काय हे! म्हातारी सोनुबाई असेल तर दुःख होणारच, आणि काळ सोकवायला तो काय भ्रष्टाचार आहे? म्हणीचा उपद्व्याप करून अर्थाचा अनर्थ होतोय असं वाटलं तर फक्त म्हणी म्हणाव्यात. त्यांना अनर्थ चिटकवून डोक्यात गोंधळ घालायला जागा देऊ नये. गोंधळ गोघळातच बरा असतो. त्याला डोक्यावर घेऊन अनर्थाचा अर्थ संकल्प कोणी मांडू नये.

२५

प्रेम पत्रांची देवघेव करण्यासाठी पोस्टमनचे काम करणाऱ्या मित्र मैत्रिणींची ओढ, कोणत्याच एका पक्षाला स्पष्ट बहुमत नसतांना सरकार स्थापण्यासाठी मध्यस्थांचे विविध पक्ष प्रमुखाकडचे हेलपाटे बघून ओशाळून जाते. ब्रेकअप झालेले बघून प्रियकर-प्रेयसी पेक्षा मध्यस्थच जास्त खट्टू होतो.

२६

काही तुझे, काही माझे. चूक की बरोबर माहिती नाही. अजाणतेपणी, अज्ञानतेपणी दुरावलो आपण त्यामुळे. आपण एकमेकांना सावरले नाही, इच्छा असूनही. जवळीक साधता आली नाही, दुरावाही वाटला नाही. आपल्यात काय नाते होते ठाऊक नाही. आपण ते स्वीकारले, ते कदाचित प्रेम असेल? नसेल ही. आपले सान्निध्य नियतीचा डाव असेल. नसेलही. दोन ध्रुवावरचे असूनही आपली गाठ पडली पण समांतर रेषांवरून! चालत राहू क्षितिजापर्यंत समांतर रुळावरून धावणाऱ्या गाडी प्रमाणे, चाकांनी चाकोरीला बांधल्याप्रमाणे. फक्त एकच साम्य आपल्यात, माझे मन तुझे झाले तुझे मन माझे झाले. बाकी सारे निरर्थक द्वंद्व.

२७

हवेतला मृदगंध पावसाच्या आगमनाची चाहूल देण्यासाठी पुरेसा असतो. थंडीची खरी उब गुलाबी होण्यात असते. गरम झळा उन्हाळ्याचे लक्षण. मृदगंध, गुलाबी थंडी, गरम झळा, अनुभवण्यास ऋतुचक्र म्हटले तर चिखल, पनोती, घाम यांना काय म्हणावे?

२८

अलक प्रकाराने आकर्षित होऊन प्रथमच या प्रकारचे लेखन करून बघायचे ठरवले, आणि अचानक कॉलेजचे दिवस आठवले. पी.जी.ला शिकत असतांना एक यु.जी.ची मुलगी तुझ्याकडे टक लाऊन पहात असते असे मित्राने लक्षात आणून दिले तेंव्हा जसे उगाच हुरहुरल्यासारखे वाटले होते, तसेच काहीसे वाटले.

२९

युद्ध एक द्वंद महाभारतात याला विविध छटा म्हणतात. पांडवांना कोणी पंचेंद्रिये म्हटले, कोणी कृष्णाला त्याचा आत्मा. कौरव कल्पिले गेले दुराचार आणि असत्‌चे प्रतीक. रामायण मात्र भिन्न. पुरुषार्थ आणि आदर्शाचा संवेग. या दोन्हीही महाकाव्यातील उदात्त स्त्री व्यक्तिरेखांना कलहास उत्तरदायी मानण्याचा प्रघात गैरच. त्यांच्या महान पतिव्रत्याच्या तीव्र तेजाने त्यांच्या पतींना खरे तर पराक्रमास प्रवृत्त केले. दौप्रदी, सीता केवळ निमित्त. मात्र खरे द्वंद्व होते ते दोन्हीतील पुरुषी अहंकारात.

३०

हाडं नसणारी बुळबुळीत लिबलिबीत जीभ, तलवारीला मात्र लाजवते. लाजबाब लाजणे हा खरा महिलांचा प्रांत. घायाळ करणारे नेत्र बाण आणि जिव्हारी झोंबणारे वाक्‌बाण ही दुधारी शस्त्रे त्यांच्याकडे असतांना ब्रह्मदेवाने जीभ रुपी ब्रह्मास्त्रही त्यांना देऊन टाकले. नळावरील आणि कस्पटासमान नवऱ्याशी भांडणात त्यांचा होणारा वापर पाहून ब्रह्मदेवास पश्चाताप होऊन तो ही ओशाळला असावा असे वाटते. पुरुषार्थ न गाजवता केवळ शाब्दिक वाद घालणाऱ्या माणसांना त्यामुळे बायकी म्हणत असावेत.

३१

काहीतरी असतं निमित्तमात्र अदखलपात्र पण अचानक दखल घेतली जाते. विचारांशी सांगड घातली जाते, आणि अज्ञाताच्या मर्जीतून साकारत जातो एक अर्थपूर्ण संकल्प. विचारासोबत कृती करण्याची तीव्रता मूळ धरू लागते. मग प्रेरणा होते सकारात्मक कलाकृतीच्या निर्मितीची. संहिता लिहिली जाते. चार मित्र एकत्र येतात. प्राथमिक वाचन सोपस्कार होतात. पात्रे साकारतात आणि उभे राहते परिपूर्ण नाट्य संहिता असलेले कसदार दिग्दर्शन. उत्तम नेपथ्य प्रकाशयोजना आणि कलाकारांनी जीव ओतून केलेल्या अभिनयातून उभे राहते नवीन कोरे नाटक. प्रेक्षकांनी पाठ फिरवली की पडदा पडतो. आपण सर्व असतो विश्व रंगमंचावरच्या कळसूत्री बाहुल्या.

३२

लेखणीचे फटकार, तलवारीचे वार आणि घावापेक्षा कमी नसतात, मात्र लेखणीच्या जोरावर प्रत्यक्ष हातघाईची लढाई अथवा युद्ध जिंकल्याची नोंद नाही. तो मान तलवारीचाच, मग ते रामायण, महाभारत असो की पानिपतच्या मैदानावरील युद्ध, रामायण, महाभारतातील महान युद्धे मात्र आपणापर्यंत पोहोचतात ती तत्कालीन पुराव्यापेक्षा महर्षी वाल्मिकी आणि महर्षी व्यास यांच्या तळपत्या लेखणीतून. पानीपतच्या तीन्हीही लढायाचे भरपूर पुरावे इतस्ततः आजही पसरलेले आहेत पण तिसरे पानिपत आज गाजते ते मात्र १ जानेवारीच्या भीमा कोरेगावच्या विजयस्तंभास वंदनेच्या आणि १४ जानेवारीच्या मराठ्यांच्या पतनाच्या जखमांवरील ऐतिहासिक तथ्यांची चिरफाड करणाऱ्या प्रक्षोभक लेखण्यांच्या प्रतापाने.

३३

शिकणे शिकवणे प्रक्रियेत सूक्ष्म अध्यापन पद्धती १९६० पासून प्रचलित आहे. मराठी साहित्य शिकतांना आणि शिकवतांना ह्याचा अवलंब करून नविन पिढीने अती लघु कथा, अती लघु लेख लेखनाचा सराव करावा. त्याने दर्जेदार साहित्य निर्मिताला नवीन आयाम मिळेल. अलक किंवा अलले हे कथा आणि लेखांचा सारांश नाही. ते एक परिपूर्ण पण लघु रूप आहे. अध्ययन अध्यापन कलेचा एकनएक पण परिपूर्ण पैलू सुक्ष्म अध्यापन तंत्रात आत्मसात केला जातो. प्रत्येक सुक्ष्म अध्यापन पाठ विशिष्ट घटकासाठी छोटा पण परिपूर्ण लघु घटक असतो. अनेक लघु घटकांच्या सूक्ष्म पाठ प्रक्रियेतून तो पूर्ण घटक आत्मसात केला जातो. लघु घटकांची योग्य निवड करून सुनियोजन आणि क्रमबद्ध रचनेतून लेख, कथा, कादंबरी, प्रवास वर्णन, चरित्र आणि सर्वच संहिता लेखन कला साध्य होतात.

♦

## श्री. आप्पा खांबेटे (पृ. ६९६) यांचे मार्गदर्शन निवेदन

आपल्या परिवारातील कर्तबगार उद्योजक 'टिसाचे' संस्थापक वयोवृद्ध श्री. आप्पा खांबेटे होतकरू उद्योजकांना बहुमूल्य मार्गदर्शन करणार आहेत. महिन्याच्या शेवटच्या रविवारी सकाळी ११ ते १ या वेळेत आगाऊ दुरध्वनी करून संपर्क साधावा. तरी मराठे परिवारातील उत्सुक उद्योजक, तरुणांनी आप्पांच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा. या वयातही ते त्यांच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा फायदा आपल्या कुलबांधवांच्या पुढील पिढ्यांना देऊ इच्छितात. ति. आप्पांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच.

**श्री. मधुकर रामचंद्र खांबेटे तथा आप्पा खांबेटे**
भ्रमणध्वनी ९८६९५७५९२५

# श्रीमनाचे श्लोक
# (श्रीसमर्थ रामदास स्वामी कृत)

• डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०), वडाळा दूरध्वनी : ९८२०२३२०८२

**श्री**समर्थ रामदासस्वामी यांचा जन्म शके १५३० मध्ये श्रीरामनवमीस रामजन्माच्या वेळीच मध्यान्ही १२ वा. झाला. मराठवाड्यांतील जांब हे त्यांचे जन्मगाव. त्यांचे मुळचे नाव नारायण, वडिलांचे नाव सूर्याजी आणि ठोसर हे अडनाव.

बारा वर्षाचे असतानाच त्यांचे लग्न ठरले. परंतु ते लग्नसमारंभातून पळून गेले. नाशिकजवळ टाकळीस राहून त्यांनी बारा वर्षे कडक तप केले. गायत्री पुरश्चरण व रामनामजप यांचे हे तप पुरे झाल्यावर ते तीर्थयात्रेला निघाले.

पुढली बारा वर्षे ते तीर्थक्षेत्र पाहात सारा देश हिंडून आले. त्या हिंडण्यांत त्यांना आपल्या देशाची नि धर्माची सर्व परिस्थिती समजून आली. अखेर शके १५६६ मध्ये ते कृष्णाकाठी येऊन राहिले. त्यावेळी ते छत्तीस वर्षांचे होते.

श्रीसमर्थांनी आपल्या देशधर्माच्या कार्याला प्रत्यक्ष सुरुवात चाफळला केली. खूप मोठा शिष्यसंप्रदाय त्यांनी जमविला. देशभर ठिकठिकाणी अकराशे मठ स्थापन केले. हजारो ठिकाणी मारुतीची स्थापना केली. देवळे बांधली. लोकांना श्रीरामाच्या उपासनेला लावल. शक्तीची भक्ती सुरू केली. छत्रपती श्रीशिवाजी महाराज यांना त्यांच्या स्वराज्य संस्थापनेच्या कार्यात समर्थांची मोठी मदत झाली. महाराज समर्थांचा अनुग्रह घेऊन त्यांचे शिष्य बनले.

रामदास हे नाव त्यांनी स्वतःच घेतले, पण 'समर्थ' ही पदवी गुरू दत्तात्रेयांनी त्यांना दिली. श्रीरामदास स्वामी यांनी अनेक ग्रंथ लिहिले. खूप कविता केल्या. त्यांच्या ग्रंथात 'श्रीमत् दासबोध' हा मेरूमणी आणि 'श्री मनोबोध' किंवा 'मनाचे श्लोक' ही रत्नखाणी. त्यांच्या कवितेतील करूणाष्टके, मारूतिस्तोत्रेस आरत्या, अभंग ही प्रसिद्धच आहेत.

'आधी केले मग सांगितले' हा त्यांचा आचार. 'शहाणे करूनि सोडावे सकळ जन' हा त्यांचा विचार आणि 'साधे वोषध परी गुणवंत' असा त्यांचा उच्चार.

पुढे शिवाजी महाराजांच्या आग्रहावरून ते साताऱ्याजवळ परळीच्या किल्ल्यावर रहावयास आले. तोच सज्जनगड. तेथे त्यांनी शके १६०३ मध्ये माघ वद्य नवमीला दुपारी बारा वाजता आपला अवतार संपविला. जयजय रघुवीर समर्थ।

**श्रीमनाचे श्लोक**

'श्रीमनाचे श्लोक' हा श्रीसमर्थ रामदास स्वामींनी मानव समाजाला दिलेला बहुमोल ठेवा आहे. मनाच्या श्लोकांतून श्रीसमर्थांनी केलेला उपदेश समाजाच्या सर्व स्तरांतील व स्थितीतील लोकांना अत्यंत मार्गदर्शक आहे.

मन हे मनुष्य बंधनाचे तसेच मोक्षाचे कारण आहे. मनाला योग्य वळण लावल्याशिवाय मनुष्याला ऐहिक किंवा पारमार्थिक कायाण साधता येणार नाही. यासाठीच समर्थांनी मनाला उपदेश केला आहे.

मनुष्याने मीपणा- अहंकार सोडावा. विचार, आचार व उच्चार शुद्ध ठेवावे. त्यात एकवाक्यता राखून मन सर्वदा रामभजनात तत्पर ठेवावे. हे 'मनाचे श्लोक' यातील सार आहे. मनाच्या श्लोकांचा अर्थ सारांशरूपाने दिला आहे.

**गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा।**
**मुळारंभ आरंभ तो निर्गुणांचा।।**
**नमूं शारदा मूळ चत्वार वाचा।**
**गमूं पंथ आनंत या राघवाचा ।।१।।**

भावार्थ – शिवगणांचा अधिपती, ज्ञानवैराग्यादि षड्गुणांचा अधीश व परब्रह्माचा मूळ आरंभ असा तो गजानन त्याला, तसेच चार प्रकारच्या वाणीची (परा-परमान्ति, मध्यमा-वैश्वरी) देवता जी शारदा तिला वंदन करून आपण प्रभू रामचंद्राच्या भक्तीचा अनंत मार्ग धरू या.

हा पहिला श्लोक मंगलाचरण रूप असून ह्याचाच चौथ्या चरणांत 'मनोबोध' ग्रंथरचनेचा हेतु सांगितला आहे. अनंत अशा राघवाच्या पंथ कळावा ह्या हेतुने गणेश-शारदांना वंदन केले आहे. गणेश, शारदा, राघव व त्याचा पंथ या चारही पदांचा गूढार्थ ध्यानी आल्यावर श्लोकाचा भावार्थ समजेल. राघव व राघवाचा पंथ ग्रंथाच्या विवरणाने कळणार असून शेवटच्या श्लोकांत ग्रंथाची फलश्रृती सांगितली आहे. तो पाहता राघवाचा पंथ उमगल्याने मतिमंदही निर्दोष होऊन साधनाला योग्य होतील, त्यांच्या अंगी ज्ञानवैराग्यांचे सामर्थ्य चढेल व ते विश्वास ठेवतील तर मुक्तीचा सुखसोहळा भोगतील असे समर्थांचे आश्वासन आहे. अर्थात् हे श्लोक त्यांच्या प्रचितीचे बोल आहेत. ♦

# आजीच्या गावची बातच न्यारी!

• गुरुनाथ मराठे (पृ. ४०८), बोरिवली भ्रमणध्वनी : ९९६९३८८४३४

रत्नागिरी एसटी स्टँडहून सिटी बसने ४०-४५ मिनिटांचं अंतर पार केलं की, केळये-मजगाव येथे पोहोचता येतं. फार पूर्वीच्या काळी आजीच्या घरापर्यंत सिटी बस जात नव्हती. याचं कारण मातीचे कच्चे रस्ते. त्यामुळे केळये मजगाव स्टँडपासून पायवाट तुडवत आणि पायऱ्यांची घाटी चढत अर्धा तास चालल्यावर आजीचं घर येई. पण कालांतराने स्थानिक ग्रामस्थ सुहास सहस्त्रबुद्धे, अरुण गोखले, विजय केळकर आणि चंदू बापट यांच्या अथक प्रयत्नानं डांबरी रस्ते झाल्यामुळे आजीच्या घरात आता पाच मिनिटांत पोहोचता येतं. रस्त्याच्या सोयीबरोबरच, रात्रीच्या कंदिलाच्या प्रकाशाची जागा आता चक्क बल्ब आणि ट्यूबच्या प्रकाशाने घेतली, ती १९७९ साली.

केळये-मजगांव येथील निसर्गसौंदर्य मनमोहक आहे. आजूबाजूला हिरवीगार झाडं, अवतीभोवती असणारे डोंगर आणि मध्येच दिसणारी टुमदार कौलारु घरं पाहून मन आनंदित होतं. आजीकडे थोडीशी शेतजमीन होती. त्यात भात लावलेला असायचा. तर काही ठिकाणी हिरव्या मिरच्या आणि वांगी लावलेली असायची. गोठ्यात शेती करण्यासाठी दोन रेडे आणि घरी दूध मिळेल इतपत दोन गायी होत्या. लहानपणी शाळेत असताना, मे महिन्यात आजीच्या गावी आम्ही सातत्यानं जात असू. सकाळी उशिरा उठायचं, आंघोळ करायची, दिवसभर मनसोक्त आंबे-फणस खायचे, तर कधी संध्याकाळी करवंदाच्या जाळीत जाऊ करवंदं खायचो. संध्याकाळी सव्वा सहा आणि साडेसहाच्या दरम्यान रात्रीचं जेवण होत असे.

माझी आजी प्रेमळ आणि शांत. जास्त शिकलेली नव्हती तरी व्यवहाराला चोख होती. ती आम्हाला चार पदार्थ मायेनं खाऊ घालायची, उदा. कधी आंब्याचा रस बनवायची, कधी उकडीचे मोदक, तर कधी घावन घाटले बनवायची. एकंदरीत आमची मजा असायची. रोज रात्री झोपण्यापूर्वी आजी आम्हा नातवंडांच्या डोक्यावर तेल चोळण्यास विसरत नसे. या गावचं एक वैशिष्ट्य म्हणजे आजीच्या घरापासून अर्धा ते पाऊण तास चालत गेलो की, लक्ष्मीकांताचे मंदिर लागतं. तिथं काकडा आरती उत्सव होतो. कार्तिक पौर्णिमेला आरतीभोवती ललिताचं कीर्तन आणि स्थानिक ग्रामस्थ सादर करत असलेलं नाटक असे कार्यक्रम होतात. त्याचबरोबर समाप्तीच्या दिवशी, गावातील लोकांना महाप्रसाद म्हणून जेवण देण्यात येतं. काही वर्षांपूर्वी माझी आजी गेली. त्यानंतर चार वर्षांपूर्वी मामा गेला. आता गोठ्यातील गायी आणि रेडे हेदेखील नाहीत. त्यामुळे गोठा उजाड वाटतो. आता मामी एकटी घरात असल्यानं ते घर शांत वाटतं. थोडक्यात, त्या घराचं चैतन्यच हरवून गेल्यासारखं वाटतं. मामीच्या प्रेमाखातर दोन वर्षांतून एकदा तरी गावी जाणं होतं. आता मागे उरल्या आहेत फक्त त्या गतदिवसांच्या सोनेरी आठवणी. ♦

## अभिनंदन



कुमारी ऐश्वर्या नागेश मराठे (पृ. ५४१), पुणे ही टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे या विद्यापीठाने घेतलेल्या एम.एससी (नुट्रिशन) ह्या पदव्युत्तर परीक्षेत सर्वप्रथम आल्याचे विद्यापीठाने घोषित केले. तिने पुढील शिक्षणाकरिता इलीनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, शिकागो, अमेरिका येथे फूड सायन्स व टेक्नॉलॉजीचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याकरिता दिनांक २२-८-२०२२ रोजी प्रयाण केले. तिला मराठे प्रतिष्ठानच्या वतीने पुढील वाटचालीकरिता हार्दिक शुभेच्छा!!! मराठे प्रतिष्ठानद्वारा कुमारी ऐश्वर्याचे हार्दिक अभिनंदन.

**भ्रमणध्वनी : ९७६३६४४८८९**

# १२ जुलै १९६१
# पानशेत प्रलय दिवस

• सौरभ मराठे, पुणे

**इ**सवी सन १८१८ ला मराठा साम्राज्याचा अस्त झाला आणि ब्रिटिश सरकारचे राज्य सुरू झाले!

पुण्यासारख्या ठिकाणी अनेक बदल घडत गेले. पारंपरिक पाण्याच्या योजना अपुऱ्या पडू लागल्या आणि नव्या सरकार ने एक महत्त्वपूर्ण योजना हाती घेतली. ती म्हणजे खडकवासला धरण बांधण्याची. १८७९ साली ह्या धरणाचे काम पूर्ण झाले आणि नळाचे पाणी पुण्यात येऊ लागले.

पुण्याची लोकसंख्या वाढत होती आणि त्याच बरोबर वाढत होती पाण्याची मागणी. १९४६ च्या सुमारास खडकवासला धरणातून होणारा पाणीपुरवठा अपुरा पडू लागला. भविष्यात असे काहीतरी होऊ शकते ह्याची कल्पना आधीच आल्याने १९०७ पासून अनेक पर्याय विचारात घेण्यात येत होते. त्यातील एक म्हणजे खडकवासला धरणाच्या वर अंबी ह्या मुठेच्या उपनदी वर पानशेत आणि मोशी ह्या उपनदी वर वरसगाव येथे नव्याने धरण बांधणे.

खडकवासला धरणाची उंची वाढवण्याचा एक पर्याय समोर असताना वरसगाव आणि पानशेत येथे धरण बांधण्याचा प्रस्ताव पुढे मान्य करण्यात आला. चिरेबंदी धरण बांधण्यापेक्षा मातीचे धरण बांधण्यास कमी खर्च येतो म्हणून मातीचे धरण बांधण्याचे ठरवले गेले.

पानशेत धरण बांधण्यास सुमारे दोन कोटी पंचाहत्तर लाख रुपये खर्च येईल असा अंदाज होता. १९५७ साली ह्या कार्यास प्रारंभ झाला आणि १९६२ पर्यंत हे धरण बांधण्याची योजना आखली गेली. पण १९६० साली ह्या योजनेत बदल करून १९६१ पर्यंत काम पूर्ण करण्याचे ठरवले गेले आणि घाई घाईत अनेक कामेही केली गेली. १९६१ साली पाणी अडविण्याचे ठरवले आणि जून महिन्यात पडलेल्या मुसळधार पावसामुळे ३ आठवड्यातच हे धरण तुडुंब भरले गेले!!

१२ जुलै १९६१ पर्यन्त धरणाच्या जलग्रह क्षेत्रात ७० इंच पाऊस पडला. धरण तुडुंब भरले, तुफान वाऱ्यामुळे पाण्यावर लाटा निर्माण होत होत्या आणि त्या धरणाच्या भिंतीवर येऊन आदळत होत्या.

अतिवृष्टी मुळे पानशेत धरण तुडुंब भरले आहे परंतु धरणास काही धोका पोहोचू नये म्हणून योग्य ती काळजी घेतली जात आहे  अशा बातम्या प्रसिद्ध होत होत्या. धरण फुटले तर काय होईल ह्याची पुसटशी कल्पनाही पुण्यात कोणाला नव्हती किंबहुना पानशेत येथे परिस्थिती किती गंभीर आहे हे ही कोणाला माहीत नव्हते.

दिवस होता १२ जुलै चा, पुण्यातील व्यवहार नेहमीप्रमाणे चालू होते, रस्ते गजबजलेले होते, कारखाने, कचेऱ्यांची कामे सुरू होती आणि दारात उभे राहिलेले संकट कोणाला दिसतही नव्हते. काही वेळातच कधीही न अनुभवलेल्या संकटास पुण्याला तोंड द्यायचे होते.

खरंतर १० जुलैला धरणाचा काही भाग खचला. धरणाची भिंत पाण्याच्या पातळीपासून एक दोन फूट वर होती. ११ जुलै ला सकाळी ५-५.३० पासून खचलेल्या भागावर वाळूची पोती टाकण्याचे काम सुरू करण्यात आले. नंतर सकाळी, दुपारी आणि संध्याकाळी अनेक ठिकाणी भेगा पडत असल्याचे दिसू लागले. अनेक तडे गेल्याचेही आढळून आले. धरण वाचवण्यासाठी काय करता येईल या करिता एक बैठक झाली, लष्कराला पाचारण करण्यात आले आणि ११ जुलै ला संध्याकाळपर्यंत लष्करही धरणावर दाखल झाले. रात्रभर पोती टाकण्याचे काम लष्कराचे जवान करत होते पण १२ जुलै ला सकाळी ५.३० च्या सुमारास परिस्थिती हाताबाहेर गेली आहे ह्याची सर्वानाच जाणीव झाली. लष्कराने काम थांबवले. त्या नंतर लगेचच, एका तासाभरात पाण्याने उसळी मारली. पाण्याच्या वेगामुळे धरणाचा काही भाग ढासळला. बघता बघता भगदाड वाढत गेले आणि १२०० फूट लांबीची भिंत पूर्णपणे वाहून गेली! आता पाणी खडकवासला कडे धावत होते.

सकाळी आठच्या सुमारास खडकवासला धरणाच्या पाण्याची पातळी वाढायला सुरुवात झाली आणि सकाळी दहाच्या सुमारास पाणी भिंतीवरून वाहूही लागले. धरणाचा काही भाग वेगळा झाला, दुपारी धरणाच्या मध्यभागी खिंडार पडले, खडकवासला धरणही फुटले..



अपदाग्रस्त विभाग
(पानशेत प्रलय समस्या व पुनर्वसनाचे प्रयत्न)

नदीकाठी वसलेल्या छोट्या गावांना गिळंकृत करत पाणी पुण्याच्या दिशेने जोमाने प्रवास करतच होते.

सकाळी पाण्याची पातळी वाढत असल्याचे लोकांच्या लक्षात आले. सकाळी साडेअकराच्या सुमारास संभाजी पूल पाण्याखाली गेला. पाणी आता आजूबाजूच्या परिसरात पसरत होते, तोच दुपारी खडकवासला धरण फुटले. अर्ध्या तासात तो महाकाय जलाशय रिकामा झाला आणि पाण्याचा दुसरा लोंढा पुण्याच्या दिशेने निघाला. ओंकारेश्वर, संभाजी पुल पाण्याखाली होते, अनेक घरे पाण्याखाली गेली, जणू एक मोठे जलाशयच पुण्याच्या मध्यभागी तयार झाले होते.

दुपारी चार नंतर पाणी हळू हळू ओसरू लागले. संध्याकाळी ७ पर्यंत बऱ्यापैकी पाणी कमी झाले. लोकांना पुसटशी कल्पनाही नसल्याने कोणीच ह्या संकटास तोंड देण्यासाठी तयार नव्हते. पाणी वाढू लागल्यावर लोकं उंच ठिकाणी जात राहिली, कोणी इमारतीचा वरच्या मजल्यांवर तर कोणी झाडांवर चढून आपला जीव मुठीत धरून पूर ओसरण्याची वाट बघत होते.

अधिकृत माहिती नुसार २९ लोकांनी आपला जीव ह्या प्रलयात गमावला. इतर झालेल्या नुकसानाची तर गणतीच नाही. ह्या प्रलयात ७५० घरे कोसळली, १६५० घरे राहण्यास अयोग्य झाली, सुमारे १०,००० कुटुंबांचा आसरा गेला, २६,००० हुन अधिक कुटुंबाचे सामानसुमान गेले, ३६०० दुकानांची नासधूस झाली, त्यात काही दुकाने नष्ट झाली, शिवाजीनगर येथील गोदामात ४२,००० पोती धान्य कुजले, पाणीपुरवठा खंडित झाला, वीज खंडित झाली, रस्ते खराब झाले, घाणीचे साम्राज्य माजले गेले.

पुण्यात आजही नदीकाठी असलेल्या काही इमारतीवर पानशेत पूर रेषा आखलेली दिसते. त्यावरून ह्या भगत किती पाणी होते ह्याचा अंदाज बांधणे सहज शक्य आहे.

एवढ्या महाभयंकर घटनेतील एकच चांगली गोष्ट म्हणता येईल ती म्हणजे हे सगळे दिवसा घडले! रात्रीत घडले असते तर किती आणि कसा विनाश झाला असता ह्याची कल्पनाही करता येणे शक्य नाही.

आम्ही कायम पानशेत पूर - पानशेत पूर असेच ऐकत आलो आहोत. पण त्या दिवशी नक्की काय घडले हे थोडक्यात जाणून घेण्यासाठी हा लेख. माझा जन्मच पुरानंतर अनेक वर्षांनी झाला असल्याने उपलब्ध साधनांच्या आधारे पुण्याला कुठल्या दिव्यास सामोरे जावे लागले ते मांडण्याचा प्रयत्न ह्या लेखातून केला आहे.

♦

# जग दमले आहे - गोंधळले आहे!

## (भांडवली, कम्युनिस्ट व धार्मिक सत्तांचे अपयश)

• डॉ. गिरीश जाखोटिया (पृ. १२९) भ्रमणध्वनी : ९८२००६२११६

Economics of Survival या जागतिक अर्थकारणावरील लेखकाच्या आगामी ग्रंथावर आधारित.

नमस्कार मित्रांनो! होय, आर्थिक व सामाजिक उत्तरांच्या शोधात जग दमले आहे. आज एका अत्यंत गंभीर विषयाकडे आपण पाहूयात. जगभरातील प्रार्थनास्थळांमध्ये लोकांची रोजची उपस्थिती वाढली आहे कारण लोकांचं टेंशन वाढलंय. ब्रिटन आणि जपान हे प्रगल्भ लोकशाहीचे देश आहेत. ब्रिटनच्या प्रधानमंत्र्यांनी परवा राजिनामा दिला. जपानच्या माजी प्रधानमंत्र्यांची काल हत्या केली गेली. एकूणच बिघडलेल्या जागतिक वातावरणात आज राज्यकर्ते, अर्थतज्ज्ञ, सेंट्रल बँकर्स, उद्योगपती, पर्यावरण, ऊर्जा व जल तज्ञ, प्रशासकीय अधिकारी, शेतकरी, कष्टकरी, सामाजिक संस्था, सामान्य लोक इत्यादी सगळेच भांबावलेत. अन्नाचा व ऊर्जेचा तुटवडा वाढलाय, वाढलेले कार्बन व वाढलेली नापिक जमीन, लागोपाठ येणारी वादळे-भूकंप-पूर-दुष्काळ, बिकट होणारी युद्धजन्य परिस्थिती, वेगाने वाढणारी महागाई, सर्वत्र वाढलेली बेकारी व त्यामुळे वाढलेले स्थलांतर, ठप्प होणाऱ्या अर्थव्यवस्था, वाढलेला राष्ट्रवाद व म्हणून वाढलेली असहकाराची भावना, वैज्ञानिक प्रगती होत असतानाही वाढणाऱ्या अंधश्रद्धा आणि घटणारी माणुसकी. मोठाच गोंधळ माजलाय. या गोंधळावरील उत्तर शोधताना जग दमल्यासारखं - भांबावल्यासारखं दिसतंय. बऱ्याच देशांमध्ये हवालदिल झालेली कृद्ध जनता रस्त्यावर येते आहे. भांडवली लोकशाही, हुकूमशाही, कम्युनिझम, अजस्र भांडवलशाही, समाजवाद, धार्मिक सत्ता व परिवारशाही इत्यादी राजकारणाचे व अर्थकारणाचे बहुतेक सर्व प्रकार अपयशी ठरताहेत. विशिष्ट एक 'आर्थिक ढाचा' (Economic Model) पूर्णपणे व सातत्याने प्रभावी ठरत नाहीय. रोगाचं नीट निदान होत नाहीय म्हणून त्यावरील उपायही सापडत नाहीय.

संपूर्ण 'जगरहाटी'च कोसळण्याच्या मार्गाने जाते आहे. आपल्यापैकी काही म्हणतील की मी हे 'निगेटिव्ह' लेखन का करतोय. मित्रांनो, ही कठोर चिकित्सा आहे जी काही जणांना आवडू शकणार नाही. विशेषतः गेल्या तीन - चार दशकांत बहुतेक देशांमधील भांडवलशहांनी, कम्युनिस्ट नेत्यांनी, धार्मिक नायकांनी व विविध प्रकारच्या हुकूमशहांनी हा आर्थिक - सामाजिक गोंधळ हेतूपुरस्सरपणे वाढवला आणि या वाढणाऱ्या गोंधळाचा मोठा अनैतिक फायदा घेण्याचा भरपूर प्रयत्न केला. आज मात्र यांचेच अस्तित्व धोक्यात आले आहे. भांडवलशहांचा नफा हल्ली वेगाने घटतोय, कम्युनिस्ट नेत्यांची दडपशाही व छुपा भ्रष्टाचार बाहेर येतोय, धार्मिक नेते अंधश्रद्धांचा लबाड वापर करून थकलेत, तथाकथित लोकशाहींमधील हुकूमशहांची लोकप्रियता प्रचंड वेगाने घटते आहे. यांची ही पडझड यांच्याच दुष्कर्माचे फळ आहे जे मुख्यतः जनतेला भोगावे लागत आहे. भ्रष्ट भांडवलशाही, दडपशाही करणारे कम्युनिझम, लोकशाहीतील त्रुटींचा कपटी वापर करीत फळफळलेले हुकूमशहा आणि धर्मसत्तांच्या या दुष्कर्माचे सूत्र मात्र समान आहे. हे सूत्र चार टप्प्यातून काम करीत आले आहे - १. भ्रमीतकरण (न घडणाऱ्या गोष्टींनी किंवा अवास्तव स्वप्नांनी जनतेस भ्रमित करणे) २. केंद्रिकरण (जनतेचे अधिकार हिरावण्यासाठी व संपूर्ण सिस्टीमचा ताबा घेण्यासाठी सत्तेचा ताबा मुठभरांच्या हाती) ३. सपाटीकरण (सांस्कृतिक, आर्थिक व बौद्धिकदृष्ट्या सर्वांना 'रोबोट्स' बनविणे) आणि ४. नष्टीकरण (सार्वजनिक मूल्यांना, लोकांच्या क्रयशक्तीला, स्वातंत्र्याला व समृद्धीच्या प्रयत्नांना नष्ट करणे).

या सूत्राचा वाईट परिणाम जेव्हा जनतेला उशिरा का होईना कळू लागतो तेव्हा हे सर्व लबाड लोक राष्ट्रभक्ती, अध्यात्मिक अंधश्रद्धा, पुरातन अस्मिता, भूविस्तार, काल्पनिक शत्रूची भिती, मानवीय समानतेच्या बेगडी घोषणा इत्यादी हत्यारे वापरु लागतात. उदाहरणार्थ, चीनचे झी (क्षी) साहेब मंडरिन भाषा व चिनी संस्कृतीचा हल्ली जयघोष करतात, पुतीन पश्चिमी देशांची लबाडी सांगतात, सौदी अरेबियाचा शेख शरियाचा आक्रमक वापर करतो नि सोबतीला पैशांची खिरापत वाटतो, अमेरिकेचे बायडेन साहेब चीन व रशियाला दोष देत जागतिक गोंधळाचा आधार घेतात, इराणचे अध्यक्ष अमेरिकी प्रतिबंधांना जबाबदार धरतात, कोलंबिया व वेनेझुएलाचे कम्युनिस्ट प्रमुख जागतिक भांडवलदारांवर दोषारोप करतात, इत्यादी इत्यादी. अर्थात अशी गोंधळलेली मनस्थिती लपविण्यासाठी याच आयुधांचे चतुर मिश्रण आमच्या येथेही बरीच दशके वापरले जात आहे. जागतिक गोंधळात आम्ही अपवाद कसे राहणार? एकदा

का 'लोककल्याणकारी अर्थकारणा'चा विसर पडू लागला की भल्याभल्या नेत्यांचे सामान्य लॉजिकही काम करेनासे होते. दमलेल्या जागतिक अर्थव्यवस्थेत आम्ही भारतीय खरे तर बरीच ऊर्जा आणि उत्साह ओतू शकतो परंतु त्यासाठी गृहकलह बाजूला ठेवून आमची कल्पकता व आमचा भारतीय एकजिनसीपणा वापरणे जरुरीचे ठरते.

बऱ्याच देशांच्या अर्थव्यवस्था या अत्यंत बिकट अवस्थेत आहेत. काही तर कोसळल्याही आहेत. काहींनी आपला खोलवर रुतलेला आर्थिक रोग लपवलाय. या जराजर्जर झालेल्या अर्थव्यवस्थांना त्यांच्या नेत्यांनी अथवा त्यांच्या शत्रूंनी या चार पैकी एका मार्गाने आजच्या दुःखद अवस्थेप्रत आणले आहे – १. आडमुठेपणा करीत स्वतःच्या अर्थव्यवस्थेला एकटे पाडले (उ. कोरिया, इराण, इराक इ.) २. प्रत्यक्ष – अप्रत्यक्ष आक्रमण करून अर्थव्यवस्थेचा विध्वंस केला (युक्रेन, सिरिया इ.) ३. भागिदारी दाखवत गंभीर नुकसान पोचवले (चीन व तैवान, रशिया व पोलंड, चीन व कालचा हाँगकाँग आणि आजची श्रीलंका इ.) ४. सामावून घेत समोरच्याचे अस्तित्व जवळपास नष्ट केले (चीन व तिबेट, इस्राएल व पॅलेस्टाईन इ.) आजही चीन बऱ्याच छोट्या आशियाई व आफ्रिकी देशांना आपल्या कर्जाच्या सापळ्यात अडकवून गंभीर क्षती पोचवतोय. अमेरिकेनेही पूर्वी व्हिएतनाम, इराक, वेनेझुएला इ. अर्थव्यवस्थांना क्षती पोचवली होती. इराण (शिया) – सौदी अरेबिया (सुन्नी) यांच्या दीर्घ काळच्या संघर्षामुळे दोन्ही गटातील अन्य छोट्या अर्थव्यवस्थांचे अपरिमित नुकसान झाले. दुर्दैवी गंमतीची बाब अशी की यांचा धर्म मात्र एकच आहे.

भांडवलदारांचा प्रचंड वरचष्मा असलेल्या लोकशाह्या या गेल्या दीड दशकांत धडाधड कमजोर होत गेल्या कारण श्रीमंतांची पोतडी भरताना हे देश गरीबांची मुलभूत क्रयशक्तीच नष्ट करीत गेले. कम्युनिस्ट देशांनी पोथीनिष्ठ समतेचा जयजयकार करीत पुन्हा उद्योगपती, वरीष्ठ कम्युनिस्ट नेते व त्यांचे बगलबच्चे, वरीष्ठ नोकरशहा, संघटनांच्या नेत्यांचेच आर्थिक भले केले. चीनने तर शेतकरी व ग्रामीण कष्टकऱ्यांकडे अक्षम्य दुर्लक्ष केले. धर्माच्या नावावर चालणाऱ्या बहुतेक अर्थव्यवस्था या वेगाने गाळात जाताहेत. याचे कालचे उदाहरण म्हणजे मलेशिया आणि आता होऊ घातलेले उदाहरण आहे इंडोनेशिया. या प्रागतिक अर्थव्यवस्थांनी नकळतपणे कट्टरतावाद अंगिकारायला सुरुवात केली आणि यांची आर्थिक पडझड सुरू झाली. धर्माधिष्ठित देश हे ऐहिक प्रगतीऐवजी काल्पनिक व प्राचीन रचनांवर भर देतात नि मग मागासलेले रहातात. रशियन अर्थव्यवस्थेतील कच्चे तेल जर काही दशकांनी संपले तर फक्त युद्ध सामुग्री व काही निवडक पिके विकून ही अर्थव्यवस्था तग धरू शकणार नाही. जपान हा संस्कार व संस्कृतीच्या अर्थाने 'बौद्ध' धर्मीय देश आहे परंतु गेली अडीच दशके तो आर्थिक कुंठितावस्थेत अडकलाय. या देशाची सांस्कृतिक ऊर्जा व बौद्धिक कल्पकता कुठेतरी कमी झाल्यासारखी वाटते. कोलंबिया, क्युबा, लाओस, व्हिएतनाम, वेनेझुएला इ. देश साम्यवाद व समाजवाद पाळत आले आहेत परंतु येथील गरीबी काही नीटपणे हटत नाही. हां, अमेरिकेच्या श्रीमंत गणल्या जाणाऱ्या पश्चिमी किनाऱ्यावर तब्बल १६% लोक गरीब आहेत! इटली, ग्रीस, स्पेन, पोर्तुगाल इ. नामांकित अर्थव्यवस्था प्रचंड कर्जाच्या बोज्याखाली आज दबल्या आहेत. बहुतेक आफ्रिकी देशांना अजूनही आर्थिक सूर गवसलेला नाही.

जगाला अर्थकारणाचा नवा ढाचा अंगिकारावा लागेल. यासाठी प्रथम हे मान्य करावे लागेल की प्रचलित ढाचे हे बहुतेक परिमाणांवर अपयशी ठरले आहेत. मनुष्याच्या सर्वांगीण विकासाची आमची व्याख्याच चुकीची ठरली आहे. कम्युनिझम म्हणजे उद्योजकतेला व गुणवत्तेला नाही म्हणणे नव्हे. भांडवलशाही म्हणजे श्रमिकांचे व शेतकऱ्यांचे शोषण नव्हे. लोकशाही म्हणजे धनाढ्यांसाठीच फक्त सरकार राबविणे नव्हे. धार्मिक आचरण म्हणजे भौतिक विकासाला नाही म्हणणे नव्हे. समाजवाद म्हणजे संपत्तीच्या निर्मितीला नाही म्हणणे नव्हे. आमच्या अर्थकारणाचा पाया हा चार खांबांवर समतोल असा उभा राह्यला हवा. हे चार मजबूत खांब आहेत – आर्थिक (भौतिक) समृद्धी, बौद्धिक विकास, सामाजिक समता आणि सांस्कृतिक आनंद. सौदी अरेबियात आर्थिक समृद्धी आहे पण बौद्धिक विकास व सांस्कृतिक आनंद नाही. चीनमध्ये भौतिक प्रगती आहे पण सांस्कृतिक आनंद व सामाजिक स्वातंत्र्य नाही. अमेरिकेत भौतिक प्रगती आहे परंतु सामाजिक व आर्थिक समता नाही. रशियात या चारही बाबींची वाणवा आहे. भारतात सांस्कृतिक आनंद आहे परंतु आर्थिक व सामाजिक समता नाही आणि बौद्धिक प्रगतीचे प्रयत्नही मर्यादित आहेत. जगण्यातील हा एकूण असमतोल आज सर्वत्र आहे. आम्हाला निरंतर (Perpetual), सर्वसमावेशक (Inclusive), सचोटीपूर्ण (Ethical), समताधिष्ठित (Equality - based) आणि आनंद (Happiness) देणारी अर्थव्यवस्था उभी करावी लागेल. यासाठीचे वैश्विक नीतीशास्त्र बनवावे लागेल जे धार्मिक कटुता, आर्थिक भ्रष्टाचार, राजकीय माज, सामाजिक असमता, पर्यावरणीय र्हास, बौद्धिक मांद्य व सांस्कृतिक अहंकार टाळणारे असेल!

*Copyright D$ jakhotiya.com*
*Right to change/reproduce withheld, IPC copyright Act 1957. The article can be forwarded with author's name for public awareness.*
*वरील लेख भारतीय प्रताधिकार कायदा १९५७ नुसार फेरफार अथवा नक्कल निषेधित. लेखकाच्या नावानिशी हा लेख विविध समूहांमध्ये पाठविता येईल.*

# गुरुविण नसे, नर नारायण

• अमोघ मराठे, औरंगाबाद भ्रमणध्वनी : ९८९०२७९४९८

आषाढातील शुक्ल पौर्णिमा ह्या दिवशी गुरुंचे पूजन केले जाते, म्हणून त्या तिथीस गुरुपौर्णिमा म्हणतात.

गुरु या संकल्पनेला जगत्‌मान्यता असण्याचे कारण म्हणजे, माणसाला आयुष्य जगताना अनेकदा मार्गदर्शनाची गरज भासते, म्हणून अनेक गुरु ही संकल्पना अनेक महापुरुषांच्या आयुष्यात दिसते.

गुरुचे गुरुपण म्हणजे कुठलीच भौतिक अपेक्षा न करता, शिष्याला होणारी आत्मज्ञानाची अनुभूती.

ज्याच्या चरणी आपल्याला ही अनुभूती प्राप्त होते तोच खरा गुरु, कारण असाच गुरु स्वयंसिद्ध असतो.

संतांनी देखील गुरुला 'माऊली'ची उपमा दिली आहे, कारण ती तिच्या पिल्लांची साथ कधीच सोडत नाही. मूल जेव्हा लहान असते तेव्हा ती त्याला जे प्रेयस म्हणजे आवडीचे आहे ते देते आणि तेच मूल जेव्हा मोठे होते तेव्हा ती त्याला जे श्रेयस म्हणजे गरजेचे आहे ते देते.

अत्यंत मवाळ आणि प्रसंगी तितकीच कठोर या दोन्ही भूमिका जशी ती पार पाडते अगदी तसेच गुरु त्याच्या शिष्याचा ज्ञानार्जनाचा प्रवास प्रेयसा पासून श्रेयसाकडे नेतो.

आपल्या आयुष्यात आई ही पहिली गुरु असतेच, नंतर वडील, नंतर शाळा - college मधले शिक्षक आणि मग office मधले mentors, हे ही गुरुच असतात, पण यां खेरीज ती प्रत्येक व्यक्ति जी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे आपल्या आयुष्यात त्याच्या सकारात्मक पाउलखुणा/ प्रेरणा सोडून जाते ती देखील आपला गुरुच होते. अगदी पु.लं. सारखे अष्टपैलू व्यक्तिमत्व देखील त्यांचे चितळे मास्तर सांगताना शेवटी सद्‌गदित होतात.

झाडावर लागणाऱ्या फळा मागे जशी कोणाचीतरी मशागत असते अगदी तसेच आपल्या प्रौढपणात मिळणाऱ्या यशा मागे भूतकाळातील कोणती तरी शिकवण असते.

लहानपणापासूनच मला इतिहासाची आवड होती, वर्गात कधीही गणित - विज्ञाना पेक्षा इतिहास - भूगोलात जास्त मार्कस् असायचे. त्यामुळे शिवाजी महाराज हे संस्कार रुपी बाळकडू मिळालेच होते. पुढे diploma मग engineering आणि मग project management हा प्रवास सुरूच आहे. पण लहानपणी असणारे महाराजां बद्दल चे प्रेम आणि आता मोठेपणी असणारा आदर हे खूप वेगळे आहे.

लहानपणी गड - किल्ले - त्यांचं धाडस - त्यांच्या गोष्टी ह्या आकर्षित करत पण आता जेव्हा project management चे नव-नवे पैलू उलगडत आहेत तस-तसं मी शिवाजी महाराजांच्या अधिक जवळ जात आहे असे लक्षात येत आहे.

Project management (प्रकल्प व्यवस्थापन) किंवा एकंदरीतच Management (व्यवस्थापन) चे सर्व principles (तत्त्व), defination/ terminology (व्याख्या) आणि techniques (तंत्र) ह्या Warfield वरुन आल्या असल्यामुळे, त्यांचे ऐतिहासिक साधर्म्य वाटते.

ज्या व्याख्यांची आता Oxford ने Managementची Dictionary उपलब्ध केली आहे, त्या गोष्टीचे विद्यापीठ (university) म्हणजे शिवाजी महाराज, हे Management Guru च. आणि त्यांचे आज्ञापत्र म्हणजे त्या व्यवस्थापनेचा Code of Conduct किंवा SOP.

त्यांच्या शिकवणीत नुसत्या Personality Developmentचा उथळपणा नसून Character Building अशी व्यापक Micro Management technique आहे.

Management मधले human resource, safety, finance, operation, risk mitigation, planning, swot analysis, quality, marketing, decision making, commitment, discipline, sacrifice हे आणि असे अनेक कंगोरे आपल्याला शिवचरित्रात दिसतात आणि ह्या पुरूषाने ते सिद्धांत ३५० वर्षा पूर्वीच जगून सिद्ध केले आहेत.

कधीही कोणताही प्रश्न जेव्हा मनाला भेडसावतो तेव्हा समर्थ रामदास स्वामींचे शिवाजी महाराजां बद्दलचे प्रेरणादायी उद्गार मनात येतात:

शिवरायास आठवावे। जीवित्व तृणवत मानावे।
इहलोकी परलोकी राहावे। कीर्तीरुपे।।
शिवरायांचे आठवावे स्वरूप। शिवरायांचा आठवावा साक्षेप।

शिवरायांचा आठवावा प्रताप। भुमंडळी।।
शिवरायांचे कैसे चालणे। शिवरायांचे कैसे बोलणे।
शिवरायांची सलगी देणे। कैसे असे।।
सकळ सुखांचा त्याग। करुनी साधिजे तो योग।
राज्यसाधनाची लगबग। ऐसी असे।।
त्याहुनी करावे विशेष। तरीच म्हणावे पुरूष।
या उपरी आता विशेष। काय लिहावे।।

या नंतर अंगावर येणारा रोमांच हाच शिवाजी महाराजांचा साक्षात्कार असतो आणि मग त्या प्रश्नाकडे बघण्याचा दृष्टीकोन ही बदलतो. गुरु ह्यापेक्षा अधिक वेगळा नसावा असे मला वाटते.

सध्या आजूबाजूला होणारी स्थित्यंतर बघता ज्ञानार्जनाची उपासना करणारा शिष्य गुरुला लाभणे आणि गुरुपण जपणारा गुरु लाभणे एकंदर अवघडच आहे. मात्र जेव्हा माणूस अज्ञानाला जवळ करतो तेव्हा कोणीतरी प्रकाश रूपी गुरु त्याला मार्गदर्शन करायला येतोच कारण –

निश्चयाचा महामेरू । बहुत जनासी आधारु ।
अखंड स्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी ।।

गुरुपौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा.

---

आरोग्य धन संपदा

# स्वस्तात मस्त पोषकद्रव्यं

महाग फळांमध्येच अधिक पोषकद्रव्यं असतात, असं नाही. स्वस्त आणि सहज उपलब्ध होणाऱ्या अनेक भाज्यांमध्येही मोठ्या प्रमाणावर पोषकद्रव्यं असतात.

कुठली गोष्ट शरीरासाठी उपयुक्त आहे आणि कुठली गोष्ट शरीरासाठी हानिकारक आहे, याचा विचार न करता आपण खात असतो. मात्र, दैनंदिन आहारात ठरवून काही गोष्टींचा समावेश केल्यास फार कष्ट न घेता शारीरिक तंदुरुस्ती राखता येऊ शकते.



**सुरण** : सुरणामध्ये मोठ्या प्रमाणात स्टार्च असतं. सुरण उपलब्ध नसल्यास बटाटेसुद्धा खाऊ शकता. बटाटा आणि सुरणात जवळपास सारखेच पोषक गुणधर्म आहेत. सुरण खाल्ल्यास सातत्यानं होणाऱ्या उलट्या थांबतात. कर्करोगाचे विषाणू नष्ट करण्याची शक्तीही सुरणात असते. बटाटा मात्र कर्करोगाच्या विषाणूंवर फारसा प्रभावी ठरत नाही.

**पातीचे कांदे** : पातीच्या कांद्यामध्य क जीवनसत्त्व असतं. पातीचे कांदे खायचे नसतील, तर हिरव्या पालेभाज्यासुद्धा खाऊ शकता. यात भरपूर फायबर असतं आणि त्याचा बाऊल मूव्हमेंटला फायदा होता. क जीवनसत्त्वाची कमतरता भरून काढण्यासाठी टोमॅटो, ईडलिंबू, संत्री आणि इतर लिंबूवर्गीय फळं खाऊ शकता.






**पालक** : पालक खाल्ल्यामुळे शरीरातील फायबर्स आणि पोटॅशियमची कमतरता भरून निघते. पालकाइतकी पोषकद्रव्यं इतर कुठल्याही भाज्यांमध्ये नसतात. मात्र, फुलकोबी, दुधी आणि पडवळ ही गरज पूर्ण करू शकतात. पालकाप्रमाणेच या भाज्यांमध्येही मोठ्या प्रमाणात फायबर्स असतात. चिंचसुद्धा शरीरातील पोटॅशियमची गरज पूर्ण करते.

**मटार** : मटारमध्ये मोठ्या प्रमाणात प्रथिनं असतात. प्रथिनांच्या प्रमाणाच्या बाबतीत मटार इतर भाज्यांपेक्षा नक्कीच सरस ठरते.



---

## सहवेदना



आपल्या 'मराठे प्रतिष्ठान'चे सध्याचे विश्वस्त व प्रतिष्ठानच्या आतापर्यंतच्या वाटचालीत महत्त्वाचे योगदान देणारे श्री. सिताराम गोपाळ खांबेटे, रा. अंधेरी मुंबई, यांचे अल्पशा आजाराने दि. २९ ऑगस्ट २०२२ रोजी दु:खद निधन झाले. 'प्रतिष्ठान'चे ते चालते बोलते कंम्प्युटर होते. त्यांच्या जाण्याने 'मराठे प्रतिष्ठान'ची अपरीमित हानी झाली आहे. खांबेटे यांच्या कुटुंबियांच्या दु:खात समस्त मराठे परीवार सहभागी आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.



# देवतांचे मानवीकरण

• श्री रघुवीर मराठे (पृ. ४२१), बडोदा
भ्रमणध्वनी : ९८७९१८१८३३

**श्री**... श्रीराऽऽऽऽऽम काय जादू आहे ह्या नावांत. सकाळी सकाळी ''श्रीराऽऽऽऽऽम'' असं ऐकू आलं कि चित्तवृत्ती प्रफुल्लीत होतात. शरीरांत एक प्रकारचा संचार व्हायला लागतो. बुद्धिमतेला धार येते.

शब्दांना फुलोरा येतो, न बघता दिसता पलीकडल्या चेहऱ्याची आपल्याला कल्पना येते.

झाऽऽऽऽलं बघायला नको आता किती वेळ चालेल ते. रामाचं नांव घ्यायचं आणि आवडीचे विषय चघळत बसायचं. जोपर्यंत ईकडून अथवा तिकडून सूनबाईंच्या नावाने उद्घोषणा अथवा भांड्यांचे आवाज ऐकू येत नाही तो पर्यंत ठीक आहे.

श्रीरामाच्या विरूद्ध नाही म्हणता येणार समजा असं म्हटलं तर रामाला राग न येता विष्णूकडून सूत्र कशी हलवायची ते मात्र सीतामाई बरोबर जाणतात विष्णूची सहस्र नांव घ्यायची.

प्रत्येक शतकांला चेहरा घामाने भरलेला असल्यामुळे तो पुसण्यासाठी चांगला रुमाल, चेहरा पुसून झाला कि पुढच्या शतकासाठी वेगळा रुमाल असे दहा झाले कि प्रसाद म्हणून दहा सवाष्णींना. रुमाल त्यांना द्यायचे, बर रुमाल तरी मोठे असावे तर तस नाही. रुमाल एवढे लहान की विचारायची सोय नाही. तिकडे विष्णू बिचारा हैराण. त्याला तिकडे घाम फुटायची पाळी आली. सगळ्यांना वाटलं अप्सरा, मेनका आणि उर्वशींमुळे .....पण हा मोठा गैरसमज आहे सहस्र नांवे घेतली जात असल्यामुळे त्याला बिचाऱ्याला सतत इकडेच लक्ष्य द्यावे लागत होते. अप्सरांकडे लक्ष्य द्यायला वेळच नाही. विष्णूला खात्री होती की हजार नांवे झाली की विश्रांती. तर तसं काहीच घडलं नाही.



तिकडे पण रामाच्या कानांवर सतत वनवास. बिचारा एकटा जाईल तर सीतेने आग्रह धरला त्याच्या बरोबर जाण्याचा. लक्ष्मण मग. अगदी हट्टाला पेटला म्हणून रामाला हो म्हणायला लागलं बरं लक्ष्मण आला खरा आणि रामाची प्रायव्हसी गेली. बिचाऱ्याला आता १२ वर्षे वनवासांत काढायची. तर आला सीतेचं रक्षण करायला..... राम काय असमर्थ होता? एकंदर सगळा आनंदच..

इकडे विष्णूला हे काही माहीत नव्हतं. पण शंकराच्या शिष्याला कसं हैराण करता येईल हेच सारखं करायचं. बर शंकरालाही माहीत होतं, की विष्णू असा आपल्यावर बदला घेत आहे. शंकर सुद्धा माहीत असून माहीत नसल्यासारख करत होता. सीतामाईचा त्यांतसुद्धा घोळ, राम बिचारा सरळ, एकमार्गी एकवचनी एकबाणी... कां एवढी सगळी विशेषण .... बरं विशेषण लावल्यामुळे त्याला तसंच वागायला लागत होत.

त्याच्या ह्या नियमांमुळे आधुनिक रामांना सुद्धा ह्याचा परिणाम भोगावा लागतो. जरासुद्धा त्यांना इकडे तिकडे बघायची सोय नसते. खिशातून रुमाल काढून डोळे पुसायचं निमित्त करून आजूबाजूचं सौंदर्य अवलोकन करावं लागत. आधुनिक सीतमाईंचं दुसऱ्या बाईच्या साडीकडे लक्ष असल्यामुळे ही इंदोरी, बनारसी, पैठणी कांजीवरम, का? मैसूर सिल्क ह्यामधून बाहेर येईस्तोवर रामाचं काम होउन जात असे. तिकडे विष्णूच्या बाबतीत लक्ष्मीबाई काय कमी आहेत काय? पाय चेपता चेपता जरा जरी त्यांचं लक्ष अप्सरांच्या बाजूला गेलं की हळूच पायाला चिमटा समजेल न समजेल असा घेउन आपल्याकडे बघायला लावायचं. एकंदरीत काय देव असो मानव असो सगळीकडे सारखेच.

पार्वतीबाईंनी फार दूरचा विचार करून कै. शंकराशी लग्न करण्याचा विचार केला आता

तुम्ही म्हणाल कि. कै. शंकराच्या पुढे कां लिहिलं? आता असं आहे शंकराचं वास्तव्य कुठे असते कैलासात म्हणजे एकांतात कुणाचाही त्रास एका व्यक्तीशिवाय त्रास नाही. ह्यांचं स्थान एवढं उच्च कि तिकडे प्राणिमात्राला फिरकण्याची संधीच नाही.गेला कि गेला. अशा निर्जनस्थळी कुठली स्त्री त्यांच्याशी लग्नाला तयार होईल तरी पण एक स्त्री तयार अत्यंत बिकट अवस्था असूनसुद्धा तिने त्यांच्याशी लग्न करण्याचे विचार आपल्या पिताश्रींकडे बोलून दाखवले. पिताश्रींनी एकदा समजावण्याचा प्रयत्न केला आणि मनांतल्या मनांत खूष झाले कि लग्न लावले कि आपण मोकळे. आपल्याला तिकडे जायचा प्रश्नच नाही. ते स्वतःच येणार नाही पार्वतीबाईंचा निर्धार म्हणजे कुठल्याही दगडावर कुठलीही रेघ (पांढऱ्यावर काळ किंवा काळ्यावर पांढर ज्याला जस पाहिजे तसे घ्यावे.) पार्वतीबाई थोड्या मॉडर्न विचाराच्या असल्यामुळे त्यांच्या विचारांत पक्केपणा होता. त्यांनी सगळे क्रायटेरिये अमलांत आणले (१) शंकराच्या डोक्यावर चंद्र असल्यामुळे शीतलता आणि चंद्र प्रकाश असल्यामुळे विजेची बचत. म्हटलं तर नाईट लॅम्प आहेच (२) सदैव एक वस्त्र म्हणजे धुणे अजिबात नाही. (३) अंगावर सर्प म्हणजे कुणीही जवळ येण्याची प्राज्ञाच नाही (४) पर्वत सुद्धा हिमालय म्हणजे ए.सी. (५) कमंडलू पाण्याने भरलेला म्हणजे पाणी द्या असं सांगणार नाही (६) डोक्यावरून गंगा वाहातच आहे म्हणजे पाणी काढून द्या आंघोळीचं असं काही नाही. (७) भिशी समजा करायची म्हटली तरी एवढ्या कडाक्याच्या थंडीत कुणी येणार नाही तो खर्च वाचला (८) समजा लग्नांत बोलावणं आलं... येणार नाही कारण हे आले तर एकटे येणार असे नाही नाही. ते भयानक लोक घेऊन येणार. आहेराचा खर्च वाचला. एवढा पोक्त आणि दूरवरचा विचार कोण करणार. सासरची म्हातारी मंडळी कुणी नाहीत. पुण्याच्या भाषेंत डस्टबिन नाहीत. नणंदा भावजया नाहीत. हिमालयात वास्तव्य म्हणून जाणं येणं फारच कमी. कायम ध्यानस्थ म्हणजे स्वयंपाक घरांत लुडबुड नाही मोठी नणंद असली की तिला म्हणे आक्का म्हणायच असत बरं मोठी आहे म्हणून सांभाळून घ्यायच्या ऐवजी आपला भाव किती आहे हे दाखवण्यात धन्यता. आक्काबाईचा तोरा फार गजब असतो आणि कलियुगातील आक्का तर फारच! त्यांची बुद्धिमत्ता आणि कार्यकुशलता अशी गजब असते की भले भले गार पडतात. आणि समजा त्यांना जर लहान भाऊ असेल तर त्याच नांव बाबूच का ठेवतात हे मोठं कोडं आहे. बाबू म्हटलं की तो गरीब श्रावणातल्या कहाण्यांमधला आटपाटनगरीतील एक कायमचा गरीब ब्राह्मण कसा असतो त्याप्रमाणे त्याची परिस्थिती ती आक्का करून टाकते. बरं शंकराला भाऊ नाही. म्हणजे दीराचे हट्ट पुरवायची काही भानगड नाही. न बोलता शहाणपणा ह्याला म्हणतात.

तिकडे विष्णूच्या बाबतीत सगळं एकदम विरुद्धच. लक्ष्मीबाई अंगभर आभूषणांनी लगडलेल्या. नखशिखांत ज्याला म्हणता येईल अशा. बरं ह्यांत त्यांचे चांगले सहकारी श्री. नारद हे जगभर फिरत असल्यामुळे कुठं काही नवं आभूषण दिसलं की ह्यांनी लक्ष्मीबाईंचे कान भरलेच असं आपण म्हणायचं नाही. त्याला मोठयांच्या भाषेत सजेशन म्हणतात. बरं ते तिकडे हिमालयात आणि हे इकडे पाण्यांत, त्यांच्या डोक्यावर व दंडावर साप तर हे सापावर एक नाही तर दोघेही आरूढ. तिकडे त्यांना ध्यानस्थ असल्यामुळे कुठल्याही समाचाराची जरूर नाही तर हे ह्यांचे दूत श्री नारद सर्व ठिकाणी संचार करत असल्यामुळे बित्तंबातमी अगदी गुपचूप. नारायणाला जे काहीं करून घ्यायचे असेल तर नारदाकडून करून घ्यायचे आणि आपण त्यांना पडलेली कोडी उपायांसकट सोडवायला हजर. विष्णूसाठी चांगली चांगली गाणी ऐकावयाची सोय. त्याचे चित्रण आपण नाटकांत किंवा सिनेमांत अनुभवतोच पण तिकडे डमरू शिवाय काही वाजतच नाही अगदीच चेंज हवा असल्यास शंख वाजवायचा करायचा नाही.

विष्णू कधी भडकलेला किंवा रागाने लालबूंद झालेला माहीत आहे? आणि... हे आधी जागेच व्हायचे नाही झाले तर एकदम तांडवच मधला काहीं मार्गच नाही. त्यांच्या बाबतीत शंकराने विचार न करता किंवा विष्णू आहेच नं हे लक्षात ठेवून सगळ्यांना जे पाहिजे ते आशीर्वाद द्यायचे आणि गडबड होणारच ह्या विचाराने विष्णूला सगळं सावरण्यासाठी काय काय त्रास त्या बिचाऱ्याने भोगलाय त्याचं त्यालाच ठाऊक. एक गोष्ट मात्र निश्चित कि हे असं असं घडणार ह्याची बातमी कुणाला मिळत असेल माहीत आहे? नारदालाच फक्त... आजच पान उघडायचं आणि कामाची व्यवस्था करायला लागायचं.

♦

## हसरे हितगुज

**नातेवाईक :** तुमच्या मुलाचे लग्न डिजिटल होणार म्हणजे कसं?

**वराचे वडील :** गिफ्ट देताच तुम्हाला ओटीपी येणार. तो जेवणाच्या काऊंटरवर दाखवायचा आणि पंगतीत बसायचेय.



# कविता

• राधा मराठे (पृ. ३७८)

**ज**गभरातल्या कोणत्याही भाषेत कविता हा एक महत्त्वाचा आणि लोकप्रिय प्रकार आहे. कवितेबद्दल बोलायचं तर क्रौंच पक्ष्याला पारध्याने मारलेल्या बाणाने तो विद्ध होऊन पडला असता वाल्मिकीच्या मुखातून जे शापवाणीरूप विलाप उद्गार बाहेर पडले ती पहिली कविता असं मानतात. (पाश्चात्य साहित्याचा माझा अभ्यास नाही, त्यामुळे वाल्मिकी हे जगातील पहिले कवी की भारतीय साहित्यातले याबद्दल मी खात्रीपूर्वक काही सांगू शकणार नाही.)

वाल्मिकी म्हणाले,

**मा निषाद प्रतिष्ठां त्वमगम: शाश्वती समा:।**
**यत्क्रौंचमिथुनदेकमवधी काममोहितम् ।।**

(अर्थात, हे निषाद, तुला समाजात कधीही प्रतिष्ठा प्राप्त होणार नाही, कारण तू प्रणयमग्न क्रौंच पक्ष्यांच्या जोडीतील एकाचा वध केला आहेस. - निषाद-पारधी, शिकारी)


म्हणजे कवितेचा जन्म दु:खातून, वेदनेतून झाला. पण नंतर मात्र मानवी मनात उमटणाऱ्या प्रत्येक भावनेची अभिव्यक्ती काव्यातून होऊ लागली. साहित्यातील शृंगार, शांत, वीर, बीभत्स, करुणा अशा सर्व रसांचा परिपोष कवितेतून होऊ लागला.

गद्य आणि पद्य म्हणजे कविता यांच्या आशयात फरक नसतो, फरक असतो मांडणीत. म्हणजे मी पंढरीला चाललो हे साधं, सरळ गद्य वाक्य. पण तेच पाऊले चालती पंढरीची वाट असं म्हटलं की ती कविता-पद्य होते. पुढे या पद्यरचनेला तत्कालीन कविंनी छंदबद्ध केलं. या छंदाचे काही नियम केले, छंदबद्ध काव्यरचना हे विशेष कौशल्य मानलं जाऊ लागलं. अलिकडच्या काळात मुक्तछंद हा एक नवा प्रकार कवी हाताळतांना दिसतात. पण मुक्तछंद म्हटला तरी त्याला सुद्धा एक लय, नेमका विषय आणि आशय अपेक्षित असतो. (नाहीतर त्याला 'मोकाटछंदा'चं रूप येतं आणि वाचून वैचारिक, भावनिक आनंद मिळण्याऐवजी उद्वेग येतो.)

कविता गेय असते किंवा नुसती वाचून, म्हणून आस्वाद घेण्याची असते. गेय म्हणजे जिला सुरात बांधता येते, गाता येते ती कविता. मराठी संगीतात भावगीतं, चित्रपटगीतं या सगळ्या गेय कविताच आहेत. (चित्रपटगीतांना कविता म्हणावं की नाही असा एक वाद रंगला होता, पण आपण त्यात नको पडायला. आपला संबंध फक्त कवितेच्या आशयाशी आहे.) काही वेळा तर असेही झालेले आहे की संगीतकाराला आधी सुरावट सुचते आणि मग त्याला शोभेसे शब्द बांधायची जबाबदारी गीतकारावर येते. याचं उत्तम उदाहरण म्हणजे मराठीतील अत्यंत लोकप्रिय भावगीत स्वर आले दुरूनी... संगीतकार प्रभाकर जोग नागपूर आकाशवाणीवर होते. तिथून त्यांनी एक सुरावट यशवंत देव यांना पाठवली आणि त्यांनी गीत लिहीले - स्वर आले दुरूनी, जुळल्या सगळ्या त्या आठवणी. लिहीलेल्या गीताला उठाव आणणारी सुरावट बांधणं आणि तयार सुरावटीत अचूक शब्द बांधणं यात सोपं काय याबद्दल तज्ज्ञ मंडळीत मतभेद आहेत, आपण नको त्याची चर्चा करायला.

अलिकडे काही वर्षांत 'चारोळी' हा प्रकार कवी चंद्रशेखर गोखले यांनी लोकप्रिय केला आहे. पण तो प्रकार मराठी साहित्याला नवा नाही.

'चारोळी' या नावातच त्याच्या बांधणीची कल्पना येते. केवळ चार ओळींच्या रचनेत अर्थपूर्ण आशय असेल अशी बांधणी. या चार ओळी ही स्वतंत्र रचना असेल किंवा एखाद्या



मोठ्या रचनेचा भाग असल्या तरीही स्वतंत्रपणे सुद्धा पुरेशा अर्थगर्भ असतील. आता कवी होऊ पाहणारं कुणीही आपली सुरूवात चारोळीनेच करतं असं म्हटलं तर अतिशयोक्ति ठरू नये. ४ ओळी रचून त्यातून अर्थगर्भ आशय व्यक्त करण्याचं कौशल्य फार थोड्यांना जमतं.

मराठी पद्य साहित्यात पंत कवी, तंत कवी आणि संत कवी, असे मुख्य प्रकार आहेत. पैकी संत कवी म्हणजे संतांनी लिहीलेलं काव्य हे उघड आहे. तंत कवी म्हणजे शाहिरी काव्य करणारे. पोवाडे, लावण्या वगैरे. पठ्ठे बापुराव, होनाजी ही ठळक नावं. आणि पंत कवी म्हणजे छंदोबद्ध आणि प्रासादिक काव्य करणारे कवी. वामन पंडीत, मोरोपंत, रघुनाथ पंडीत ही ठळक नावं.

पंतकाव्ये बहुश: चार ओळींची असत. संपूर्ण काव्यात जरी चार ओळींची अनेक कडवी असली तरी एखादं कडवं सुटं वाचलं तरी ते अर्थपूर्ण असे. काही ओळखीची उदाहरणे म्हणजे –

प्रयत्ने वाळुचे कण रगडिता तेलही गळे, तृषार्ताची तृष्णा मृगजळ पिऊनीही वितळे,

**सशाचेही लाभे शृंग धुंडाळिता कानन जरी,**
**परंतु मुर्खाचे हृदय धरवेना क्षणभरी।**

किंवा

**सुसंगति सदा घडो, सुजन वाक्य कानी पडो।**
**कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो।**
**सदंघ्री कमळी दडो, मुरडीता हटाने अडो।**
**वियोग घडता रडो, मन भवच्चरित्री जडो।**

किंवा रामदासांचे 'मनाचे श्लोक' संपूर्ण चार ओळींच्या रचनाच आहेत. स्वतंत्र, सुट्या वाचल्या तरी अर्थपूर्ण.

पण ही काव्ये बहुश: उपदेशपर किंवा ऐतिहासिक-पौराणिक वर्णनात्मक असतात. परंतु आमच्या लहानपणी मराठीच्या पुस्तकात सामाजिक आशयाच्या कविता असायच्या त्याही चार ओळींची कडवी असलेल्या असायच्या. उदा.

**रवि गेला केव्हाच पश्चिमेला,**
**रंग सोन्याचा तोही मलिन झाला,**
**आता लवकर काळोख पसरणार**
**आणि गरीबांचे कष्ट संपणार**

किंवा

**हिरवे हिरवे गार गालिचे,**
**हरित तृणांच्या मखमालिचे,**
**त्या सुंदर मखमालीवरती,**
**फुलराणी ही खेळत होती**

या चार ओळी कवितेतून सुट्या केल्या तरी अर्थपूर्ण आहेत.

काळाच्या ओघात रसिकांची अभिरुची बदलली आणि रोजच्या आयुष्यातल्या भावनांच्या, तात्काळ हृदयाला भिडणाऱ्या रचना अधिक लोकप्रिय झाल्या.

♦

# विशेष दखल

मार्च २०२० मधे जगभरात कोरोना महामारी सुरू झाली आणि जगाचा कारभार थांबला. अत्यावश्यक सेवा वगळता सगळे घरात बसले. आता करायचं काय? प्रत्येक जण घरात मन रमवण्यासाठी, वेळ घालवण्यासाठी काही ना काही तरी करत होते व अशात आपल्या समुहातील एका कुलबांधवाला कल्पना सुचली व त्यांनी रोज एक याप्रमाणे शब्दकोडी तयार करून सोशल मीडियावर पाठवायला सुरुवात केली. रोज सकाळी नवीन कोडे पाठवायचे व सायंकाळी निकाल जाहीर करुन विजेते जाहीर करायचे व रात्रीपर्यंत नवीन कोडे तयार करून ठेवायचे. आजपर्यंत आठशेच्या पुढे जाऊन एक हजाराच्या जवळपास ते पोहोचले आहेत. याचबरोबरीने रोज एक चारोळी पाठवली जाते. यात भर म्हणून एखादे फुल अथवा पानांचा फोटो पाठवून तो ओळखण्याची स्पर्धा रोज घेतली जाते. तसेच कोकणातील विविध भागात फिरून कातळशिल्पे शोधून त्यांची माहिती व्हॉट्सअॅप व फेसबुक वर पाठवून लोकांच्या ज्ञानात भर घालणे.

असे हे कुलबांधव म्हणजे कुर्धे येथील रहिवासी, निवृत्त हेडमास्तर 'श्री आनंद के. मराठे.'

कोरोना महामारीच्या काळामध्ये लोकांना गुंतवून ठेवणे व ज्ञानाची उजळणी करून त्यांच्या ज्ञानात वाढ करणे अशा महत्त्वाच्या कार्यात स्वतःहून वाहून घेणाऱ्या या व्यक्तीमत्वाचे मराठे प्रतिष्ठान शतशः आभारी आहे. श्री आनंद के मराठे यांना यापुढेही असेच विविध कार्य करण्याचे बळ मिळो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना.

**हेमंत मराठे (पृ.२१)**, *कार्यवाह, मराठे प्रतिष्ठान*

गणपती बाप्पा मोरया

# गणेशोत्सव सजावट स्पर्धा २०२२

आपल्या मराठे प्रतिष्ठानतर्फे सदस्यांसाठी तसेच चित्पावन कपिगोत्री ब्राह्मण असलेल्या मराठे, खांबेटे, चक्रदेव, विद्वांस आणि तद्जन्य आडनावाच्या व्यक्तींसाठी **'घरगुती गणेशोत्सव सजावट स्पर्धा'** आयोजित केलेली आहे. आपल्या स्वतःच्या घरातील गणपतींसाठी केलेल्या सजावटीची किमान दोन छायाचित्रे आपण प्रतिष्ठानकडे पाठवून आपण या स्पर्धेत भाग घेऊ शकता. याबाबतचे नियम व अटी पुढीलप्रमाणे:

- **स्पर्धेसाठी नोंदणी :** स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींनी दि. 10 सप्टेंबर 2022 पर्यंत 9220699957 या क्रमांकावर SMS करून आपले नाव व राहण्याचे ठिकाण याची नोंदणी करावी.
- **भाग घेण्यासाठी पात्रता :** 'मराठे परिवार' या facebook group वरील सदस्य, मराठे प्रतिष्ठानचे/हितगुजचे सदस्य, मराठ्यांच्या माहेरवाशिणींच्या कुटुंबातील सदस्य, इतर सर्व कपिगोत्री मराठे कुलबांधव.
- **प्रवेशिका कुठे/कशा पाठवाव्या :** 'मराठे परिवार' या facebook group वर upload किंवा admin@marathepratishthan.org या इ-मेल आयडीवर केवळ '.jpg' format मधील कमाल 2 फाइलद्वारे.
- **प्रवेशिका पाठविण्याचा कालावधी :** दि. 31 ऑगस्ट 2022 ते दि. 20 सप्टेंबर 2022.
- प्रवेशिका म्हणून पाठवलेली छायाचित्रे प्रेषकाच्या घरच्या गणपतीच्या सजावटीची असावीत, बिल्डिंग/सोसायटी किंवा आळीतील किंवा इतर सार्वजनिक ठिकाणच्या गणपतीच्या सजावटीची नव्हेत. माहेरवाशिणी आपल्या माहेरच्या गणपतीच्या सजावटीची छायाचित्रे पाठवू शकतील.
- छायाचित्रे GPS Enabled असावीत. म्हणजे फोटो काढल्याचे ठिकाण कळू शकेल.
- प्राप्त झालेल्या प्रत्येक छायाचित्रास एक क्रमांक (आयडी) देण्यात येईल व तो प्रेषकाला कळवला जाईल. त्यासंबंधी असलेल्या विचारणा (enquiry) त्या क्रमांकाचा दाखला देऊन कराव्या.
- या स्पर्धेच्या बाबतीत अंतिम निर्णय परिक्षकांचा असेल. त्यासंबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार/वादविवाद होऊ नयेत एवढीच माफक अपेक्षा आहे.

| या स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांना देण्यात येणारी पारितोषिके: | | |
|---|---|---|
| प्रथम पारितोषिक : रु.1001/- | द्वितीय पारितोषिक : रु. 751/- | तृतीय पारितोषिक : रु. 501/- |
| 20 पेक्षा जास्त प्रवेशिका आल्यास 2 उत्तेजनार्थ बक्षिसेही देण्यात येतील. | | |

**टीप:**

1. मराठे प्रतिष्ठानच्या **'कार्यकारिणी सदस्यांना'** या स्पर्धेत भाग घेता येणार नाही.
2. पारितोषिक विजेत्यांची निवड, **किमान त्रिसदस्यीय** मंडळ करेल, ज्यात फोटोग्राफी/कला/ सजावट क्षेत्रातील जाणकार दोन/तीन सभासद सदस्य तसेच एक बाह्य परीक्षक असतील.
3. या स्पर्धेसंदर्भात काही शंका किंवा सूचना असल्यास कार्यवाह श्री. हेमंत मराठे यांच्याशी संपर्क साधावा.
4. कमीतकमी 7 प्रवेशिका आल्या तरच स्पर्धा घेण्यात येईल, अन्यथा स्पर्धा रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
   ई-मेल: hemant.a.marathe@gmail.com, भ्रमणध्वनी: ९२२०६९९९५७

# जाणून घेऊ ब्राह्मणांचे कटूसत्य

• शरद पोंक्षे

**शे**कडो वर्षांपूर्वी काही लोक कर्मठ असतीलही, त्या एकाच चष्म्यातून ब्राह्मणकडे बघू नका.

**समाजासाठी झटून** देखील ज्यांचे नाव नाकारले जाते **अशा वीरांसाठी** :-



**बुद्धीप्रामाण्यवादाचा** सर्वप्रथम स्वीकार केला तो **चार्वाक ब्राह्मणाचा.**

केला ज्याने प्रथम **जातीभेदावर घाव** तो महात्मा **बसवेश्वर ब्राह्मणाचा.**

कर्मठ लोकांनी पूर्ण परिवारास त्रास दिला, तरी **गीता** केली सर्वास मोकळी तो **ज्ञानेश्वर ब्राह्मणाचा.**

प्रथम जेऊ घातले आपल्या घरी **पद-दलितास** तो एकनाथ **ब्राह्मणाचा.**

घराचा हौद दलितांना प्रथम मोकळा केला तो **एकनाथ ब्राह्मणाचा.**

**दलितांसाठी** झटली जी प्रथम स्त्री ती संत **बहिणाबाई ब्राह्मणाची.**

सर्वप्रथम **धनगरास** स्वपंक्तीत जेवायास घेऊन बसला तो वीर **बाजीराव पेशवा ब्राह्मणाचा.**

सर्वप्रथम **विधवा विवाह** केला तो **महर्षी कर्वे ब्राह्मणाचा.**

**विधवांच्या** दु:खाला फोडली वाचा तो **आगरकर ब्राह्मणाचा.**

**दलितांच्या हक्कासाठी** सर्वांशी लढला तो **सावरकर ब्राह्मणाचा.**

ब्राह्मण लोकांनीच सर्वप्रथम जातीभेद आणि अनिष्ठ रितीना विरोध केला आहे त्यावर तयार केलेले हे गद्य काव्यः-




एक ब्राह्मण ज्याने पृथ्वीवरील अधर्मीयांचा **२१** वेळा संहार केला आहे ते **भगवान परशुराम.**

एक ब्राह्मण होता ज्याने निजाम, मोगल, इंग्रज, पोर्तुगीज यांचे कर्दनकाळ ठरून दिल्ली जिंकून औरंगजेबाचे साम्राज्य उद्ध्वस्त केले. संभाजी महाराजांच्या हत्येचा सूड घेतला. ४१ लढाया लढून शंभर टक्के यश मिळविणारे आणि एकही लढाई न हरणारे थोर धुरंधर, **अपराजित योद्धे बाजीराव पेशवे.**



एक ब्राह्मण होता ज्याने सतत २१ तास चालून शरीर थकलेल्या स्थितीत असतांनाही मोठ्या हिंमतीने ६ ते ७ तास घोडखिंड लढविली कारण स्वराज्यनिर्मितीसाठी छत्रपती शिवाजी महाराज सुखरूप, सुरक्षित राहायला हवेत. ते **वीर बाजीप्रभु देशपांडे.**

एक ब्राह्मण होता ज्याने ब्रिटनमधून भारतात शस्त्रे पाठविली, ती शस्त्रे नाशिकमध्ये क्रूर ब्रिटीश अधिकारी यांना मारण्यासाठी वापरली होती. त्याने २७ वर्षे अंदमानात काढली. ते **स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर.**



एक ब्राह्मण होता, ज्याने इंग्रजांविरूद्ध सशस्त्र क्रांती करण्याचा प्रयत्न केला होता त्याला इंग्रजांनी एडन येथे फाशी दिली. ते **वासुदेव बळवंत फडके.**

एक ब्राह्मण होता ज्याने १८९९ मध्ये पुण्यात गणेश खिंड रस्त्यावर रँड साहेबाचा गोळ्या घालून वध केला आणि स्वतः फाशी गेले ते **चाफेकर बंधू.**

एक ब्राह्मण अग्रगण्य राजकीय पुढारी, भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचे आद्य प्रवर्तक, भारतीय असंतोषाचे जनक, गणितज्ञ, खगोलतज्ज्ञ, राजकीय तत्त्वज्ञ, पत्रकार, संपादक, लेखक, वक्ते आणि स्वातंत्र्य सेनानी असे **बाळ गंगाधर टिळक.**

ह्या सर्व महान व्यक्तींना शतशः प्रणाम.

**प्रेषक : श्री. प्रभाकर दामोदर मराठे**

**(पृ. १२०)**

पुस्तक-परिचय

# तेजोभास्कर-दामोदरपंत सावरकर

• डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०), वडाळा दूरध्वनी – ९८२०२३२०८२

क्रांतिकारकांचे मुकुटमणी, अलौकिक, प्रतिभासंपन्न, महाकवी, साहित्यिक नाटककार, विज्ञाननिष्ठ, समाजसुधारक, हिंदु संघटक, महायोगी तत्त्वचिंतक, द्रष्ट्या महापुरुष अशा शतपैलू सावरकर या महान लोकोत्तर विभूतीमत्त्वाचे बालपण, त्यांचे माता-पिता म्हणजे आई-वडील, भाऊ-बहिणी, परिवार याविषयी जाणून घ्यायचे अेक प्रकारचे कुतूहल मनात असते. कोणत्या मुशीतून हे रसायन निर्माण झाले? कोणत्या आई-वडिलांच्या पोटी असे संतान जन्माला आले। किती भाग्यवान असतील असे माता-पिता इतके गुणी लेकरू, असे रत्न तिच्या पोटी जन्माला आले? धन्य त्या मातेची कूस, किती भाग्यवान असेल ती माता, किती पुण्य केले असेल तिने?



स्वतः सावरकांनी आत्मवृत्त लिहिले आहे, त्यात बालपणीच्या आठवणी लिहिल्या आहेत. शि.ल.करंदीकर यांनी सावरकर चारित्र लिहिले आहे. मोठा ग्रंथ आहे हा त्यात त्यांचे बालपण, आई-वडील, भाऊ-बहिणी, सवंगडी, शाळा, कुटुंब याविषयीची माहिती आपल्याला मिळते. पण हे सर्व वाचतोय कोण? आज तर पुढील युवापिढी मोबाईल, लॅपटॉप, टि. व्ही, सोशल मिडिया यात इतकी गढून गेली आहे, प्रलोभनांच्या मागे इतकी रमून गेली आहे की विचारूच नका. त्यामुळे वेळ नसतो. तेव्हा एवढे मोठे ग्रंथ हातात घेण्याची हिंमत होत नाही तर त्याच्या वाचनाची गोष्ट तर दूरच राहिली परंतु 'तेजोभास्कर' दामोदरपंत सावरकर हे लेखिका श्रीमती मंदाकिनी भट यांनी लिहिलेले छोटेसे पुस्तक हातात धरून, वाचून ते पूर्ण करता येणे सहज शक्य आहे. 'साने लहान परिणामी थोर' असे हे पुस्तक आहे नावही सार्थ तेजोभास्कर.

मनात प्रश्न येतो आतापावेतो कोणीही यावर का बरे लिहिले नाही? या विषयावर का बरं लिखाण झाले नसावे? याचे कारण कदाचित असे असावे, मला तरी वाटते की, स्वातंत्र्यवीर सावरकरांसारख्या महनीय, लोकोत्तर, अलौकिक व्यक्तिमत्वाची भुरळ पडून, भारावून जाऊन, सावरकरांच्या जीवनावर अनेक पुस्तके लिहिली गेली. सावरकरांच्या अद्भुत चरित्राची मोहिनी जनमानसावर पडली. सावरकरांच्या शतपैलू गुणांवर महाकवी सावरकर, अंदमानपर्व, मार्सोलिसची उडी, शुद्धिकार्य, रत्नागिरीतील स्थानबद्धता या सर्व भागांवर एकेक स्वतंत्र पुस्तके विपुल प्रमाणात लिहिली गेली, प्रकाशित झाली. पण सावरकरांच्या आई-वडीलांविषयी स्वतंत्र असे पुस्तक लिहिले गेले नाही असे नाईलाजाने म्हणावे लागते. ही उणीव मंदाकिनी ताईंनी 'तेजोभास्कर' पुस्तक लिहून पूर्ण केली. मराठी साहित्यसंपदेत या पुस्तकाने मोलाची भर घातली हे निश्चित.

**तेजोभास्कर-दामोदरपंत सावरकर**
**लेखिका :** श्रीमती मंदाकिनी भट
भ्रमणध्वनी : ९९३०३०३५९६
**प्रथमावृत्ती :** २८ मे २०२२
**ज्ञानजिज्ञासा प्रकाशन**
**पृष्ठसंख्या :** ६३
**मूल्य :**१२० रु/-

**पुस्तक लिहिण्यामागची भूमिका**

**इतिहासाचे पहिले पान न मिळणे कधी पहायाते।**
**'आरंभ तुझा दुसऱ्या पानापासूनि' शाप हा याते।।**

लेखिका मनोगतात म्हणते की, बाबाराव, तात्याराव आणि डॉ. नारायण तथा बाळ सावरकर यांना जन्म देणाऱ्या दामोदरपंत आणि राधाबाई यांच्याबद्दल अत्यंत त्रोटक माहिती वाचनात आली. राधाबाई आणि दामोदरपंत यांच्याबद्दल लिहिले पाहिजे, ही उर्मी लेखिकेला स्वस्थ बसू देत नव्हती. तेव्हा जी काही थोडी साधने उपलब्ध होती त्याच्या आधारे दामोदरपंत आणि राधाबाई यांचे जीवन लेखिकेने समजून घेतले. आई-वडिलांचे गुणविशेष मुलांमध्ये कसे उतरले आणि संस्कारित झाले हे या पुस्तकातून उत्तमरित्या लिहिले आहे. इतिहासाचे पहिले गहाळ होऊ पाहणारे पान शोधून त्यावर नवीन प्रकाश टाकला आहे.

आई, राधाबाई निवर्तल्या त्यानंतर वडिलांनी म्हणजे दामोदरपंतांनी आई जी जी कामे करते, ती स्वतः सर्व करून आईची उणीव मुलांना जाणवू दिली नाही. सावत्र आईचा जाच नको म्हणून वय लहान असतानाही दुसरे लग्न केले नाही. वडिलांचा त्याग, प्रेम, शिस्त आणि संस्कार यामुळे तिघा बंधूंनी देशासाठी अलौकिक कार्य केले. नाशिकच्या टिंगलखोरांनी, 'ग्रंथकीटक' म्हणून विनायकाची संभावना केली असली तरी पुढे याच ग्रंथकीटकाने साहित्य-सम्राट म्हणून नाव गाजविले. साहित्य-संमेलन अध्यक्षपद भूषविले आणि ६००० पेक्षा जास्त प्रश्नांची ग्रंथरचना केली. तपकिरीचा 'नत्स्य' म्हणून कसा उपयोग करून घेतला, इ. गोष्टी लेखिकेने उत्कृष्टपणे लिहिल्या आहेत त्यामुळे पुस्तक वाचनीय झाले आहे.

**मैनाताई तथा माई**

राधाबाई-दामोदरपंत यांची एकुलती एक मुलगी, तीनही 'राष्ट्रभक्त' सावरकर बंधूंची ऐकमेव भगिनी मैनाताई काळे, विवाहानंतर 'माई' म्हणून परिचित झाल्या. त्यांच्यासंबधींही माहिती आपल्याला वाचायला मिळते. सावरकरांना एक बहीण होती हेच पुष्कळ लोकांना माहित सुद्धा नाही. त्याचप्रमाणे बापूकाका (दामोदरपंताचे बंधु) सावरकर कुटुंबांतील तीन जावा, त्यांचे पतीच्या देशकार्यातील योगदान, त्यांचा त्याग व कष्ट यांचीही थोडक्यात माहिती या पुस्तकात आली आहे. मुद्रणदोष थोडेसे आहेत. उदा. भरेतो झुंजेन-मरेतो पाहिजे (पृ.३६) अतिसयोक्ती (पृ.६) अतिशयोक्ती हवे होते, झलत तिथे झलक (पृ.३७) पुढच्या आवृत्तीत हे टाळता येईल. अशोक, विक्रम, श्रीहर्ष, चपला, निर्मला असा ज्येष्ठ क्रम भावंडांचा हवा होता तर अशोक नंतर श्रीहर्ष आले आहे (पृ.६०) मुखपृष्ठ सुंदर रेखाटले आहे. शीर्षक ही समर्पक आहे. ऐकूणच 'तेजोभास्कर' अशा दामोदरपंतांचे चरित्र इतिहासाच्या अभ्यासकांना मार्गदर्शक ठरेल. ध्येयवेड्या तरुणांनी, वाचकांनी यातून प्रेरणा घेऊन यावर आणखी आवश्यक संशोधन करून पुढे काही लिहिले तरी लेखिकेला हे श्रम सार्थकी लागल्याचे समाधान लाभेल असो.

सावरकर घराणे आणि सावरकर बंधूंचे आई-वडिल दामोदरपंत व राधाबाई यांचेविषयी आणि भगूरच्या वाड्यात त्यांनी मुलांवर केलेले संस्कार तसेच त्यातून फुलत गेलेली देशभक्ती यांचे उत्तम चित्रण म्हणजे श्रीमती मंदाकिनी भट लिखित, 'तेजोभास्कर-दामोदरपंत सावरकर' हे पुस्तक होय. दि. २८ मे सावरकर जयंतीदिनी भगूर येथे सावरकरांच्या वाड्यात पुस्तकाचे प्रकाशन झाले हे भाग्य लेखिकेचे आणि पुस्तकाचे.

♦

---

अभिनंदन

# मानसन्मान



श्री. सतीश मराठे (पृ. १२९) यांची रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळावर ४ वर्षांसाठी फेरनिवड करण्यात आली आहे. सहकार भारती या संस्थेचे ते संस्थापक सदस्य असून त्यांनी ६ वर्षे राष्ट्रीय अध्यक्षपद भूषविले. २०१५ मध्ये इफको ने सहकारिता रत्न पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले होते. श्री. सतीश काशिनाथ मराठे हे अर्थ व सहकार तज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. मराठे प्रतिष्ठानचे ते विश्वस्त होते. आणिबाणीच्या काळात त्यांनी १९ महिने तुरुंगवासही भोगला आहे.

२०२० मध्ये श्री. सतीश मराठे यांचा मराठी कुलभूषण सन्मानाने मराठे प्रतिष्ठानने पुरस्कृत केले होते. मराठे प्रतिष्ठान द्वारा श्री. सतीश मराठे यांचे हार्दिक अभिनंदन

# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

• माधव मराठे, पुणे

भ्रमणध्वनी : ९०२२४१७०२१

**भा**रताचा पंचाहत्तरावा स्वातंत्र्य दिन आपण सर्वांनी १५ ऑगस्टला साजरा केला. यापूर्वी या दिवशी सर्व राज्यात प्रत्येक गावात आपला तिरंगी राष्ट्रध्वज उभारला जात असे पण तो केवळ प्रशासकीय कार्यालयावर! या वर्षी आपल्या पंतप्रधानानी सर्व भारतीयांना आपल्या घरावर तीन दिवस राष्ट्रध्वज फडकवावा असे आवाहन केले होते आणि त्याला उत्तम प्रतिसाद लाभला ही आनंदाची गोष्ट आहे.

ध्वज हे मनाचे, यशाचे व अभिमानाचे चिन्ह म्हणून पुरातन काळापासून मानले जात होते. ध्वजाची परंपरा वैदिक काळापासून भारतात आहे. ऋग्वेदात भगव्या ध्वजाचा उल्लेख आहे. सूर्य चिन्हांकित भगवा ध्वज हा देवसेनेचा ध्वज होता. इसवीसनपूर्व २००० सालापासून भगव्या ध्वजाची परंपरा भारतात आहे. भगवा ध्वज हा पराक्रम, अपरिग्रह व त्याग यांचे प्रतीक आहे. सर्व देवळांवर भगवा ध्वज असतो.

पौराणिक काळी राजे किंवा सरदार यांचे ध्वज त्यांच्या महालांवर किंवा रथावर लावले जात असत. संपूर्ण राज्याचा एकच ध्वज लावण्याची पद्धत नव्हती. महाभारतात ध्वजाचे उल्लेख आहेत त्या ध्वजाना नावेपण होती. अर्जुनाचा कपिध्वज, भिष्मांचा तालध्वज, भीमाचा सिंह ध्वज, दुर्योधनाचा गजध्वज इत्यादी. मौर्यांचा मयूर ध्वज तर गुप्तांचा गरुड ध्वज असल्याचा इतिहासात उल्लेख आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा जरीपटका ध्वज प्रसिद्ध आहेच.

देशाचा एकच ध्वज ही पद्धत युरोपात सुरू झाली. तेराव्या शतकात डेन्मार्क या देशाने आपल्या पूर्ण देशाचा एकच ध्वज ठेवण्याची पद्धत सुरू केल्याचे मानले जाते.

मादाम कामा यांनी जर्मनीमध्ये भारताचा तिरंगी ध्वज प्रथम फडकवला पण त्यामध्ये हिरवा केशरी व तांबडा असे रंगाचे तीन आडवे पट्टे होते. हिरव्या पट्ट्यात कमळाची आठ चित्र होती, केशरी पट्ट्यात वंदे मातरम् ही अक्षरे व तांबड्या पट्ट्यात सूर्य व चंद्र यांची चित्रे होती. हा ध्वज प्रचलित झाला नाही.

भारताचा तीन रंग व मध्ये अशोकचक्र हा राष्ट्रध्वज २२ जुलै १९४७ रोजी अधिकृतपणे ठरवण्यात आला. माजी राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांनी आपल्या राष्ट्रध्वजाचे वर्णन खूपच चांगल्या शब्दात केले आहे. ते म्हणतात, केशरी रंग हा त्यागाचे द्योतक आहे, पांढरा रंग हा प्रकाश व सत्यमार्ग यांचा द्योतक आहे व हिरवा रंग मानवाचे निसर्ग व भूमीशी असलेले नाते दर्शवतो. अशोकचक्र हे भारतीय कला, तत्वज्ञान, इतिहास व संस्कृती यांचे प्रतीक आहे.

आपल्या या राष्ट्रध्वजाविषयी एक कवी म्हणतात :

देशप्रेमींचा हा कैवारी।<br>
देशद्रोहिंचा कट्टर वैरी ।।<br>
फितुराना लावी सुरुंगा ।<br>
उंच आकाशी फडके तिरंगा ।। ♦



# तिहेरी जबाबदारी निभावताना...

**– प्रिया मराठे–मोघे (पृ. २७७)**

**नाटकातून अभिनयाचे पहिले संस्कार झाले; तर मालिकेनं मला ओळख दिली, घराघरांत पोहोचवलं. त्यामुळे माझ्या जवळच्या दोन्ही माध्यमांमधून प्रेक्षकांचं मनोरंजन करता येतंय ही खूप समाधानकारक गोष्ट आहे. एकाच वेळी तीन अतिशय दमदार आणि वेगळ्या भूमिका मला करायला मिळताहेत याहून एका कलाकारासाठी सुखावणारी दुसरी गोष्ट नाही.**

**– प्रिया मराठे**

**म**राठी मनोरंजनविश्वात स्वतःचा ठसा उमटविलेल्या अनेक नावांपैकी एक म्हणजे प्रिया मराठे. तिनं मालिका, नाटक या माध्यमांतून दमदार अभिनयानं प्रेक्षकांची मनं जिंकली. सध्या ती एकाच वेळी दोन नाटकं आणि एक मालिका अशा तीन



कलाकृतींमध्ये भूमिका साकारत आहे. वेळेचं गणित अचूकपणे साधत ती 'तुझेच मी गीत गात आहे' या मालिकेत तर 'अ परफेक्ट मर्डर' आणि 'तिला काही सांगायचंय' या नाटकांमध्ये काम करतेय. एकाच वेळी वेगवेगळ्या भूमिका साकारतानाच्या अनुभवाबद्दल प्रियानं सांगितलं, 'शनिवार-रविवारी नाटकांचे प्रयोग, दौरे आणि सोमवार ते शुक्रवार मालिकेचं चित्रीकरण असं व्यग्र वेळापत्रक असतं. हे सगळं सांभाळणं एक आव्हान असलं तरीही ते पेलायला तितकीच मजा येतेय. अभिनयाची आवड असल्यामुळे मला कामाचा कधीही कंटाळा किंवा थकवा जाणवत नाही.'

प्रियानं याआधीही मालिकांमध्ये नकारात्मक पात्रं साकारली आहेत. असं असलं तरीही तिच्या याही भूमिकांनी प्रेक्षकांच्या मनात घर केलं. आता ती मालिकेत साकारत असलेल्या भूमिकेलासुद्धा प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळतोय. प्रेक्षकांना नकारात्मक पात्राचा येणारा राग हीच कामाची पोचपावती असल्याचं ती सांगते. तर दुसरीकडे ती 'अ परफेक्ट मर्डर' या नाटकात मीरा मुजुमदार ही भूमिका साकारतेय. त्याबद्दल ती म्हणाली, 'मीरा मुजुमदार ही व्यक्तिरेखा माझ्याहून थोडी वेगळी आहे. खऱ्या आयुष्यात मी तिच्यासारखी नसल्यानं मला ती भूमिका साकारायला मजा येतेय.' तर 'तिला काही सांगायचंय' या नाटकातल्या मिताली या भूमिकेतून आपला मुद्दा स्पष्टपणे कसा मांडायचा, विचारांची स्पष्टता कशी असावी हे शिकायला मिळाल्याचं ती सांगते. ♦




**पत्रव्यवहाराचा पत्ता :** संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई – ४०० ०३१
भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२ • इ-मेल : **hitguj@marathepratishthan.org** • वेबसाईट : **www.marathepratishthan.org**